

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



हिंदुजननायक



आशीर्वाद



स्व. अरुणकाका जगताप



मा.श्री.सचिनभाऊ जगताप



निराधारांचा आधार... तरुणांचा आवाज...
कार्य कुशल नेतृत्व...

मा.श्री.आ. संग्रामभैय्या जगताप

आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा!

शुभेच्छुक - हॉटेल श्रीरंग व्हेज-नॉनव्हेज, परमिट रुम अँण्ड बिअर बार | आकाश बिअर अँण्ड वाईन शॉपी | दिल्ली गेट, अहिल्यानगर | भारत बाबुराव जाधव



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ११.०६.२०२६ | अंक नं. ०६१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020






•शुभेच्छुक•

श्री. अनिल जाधव

दयानंद बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स

सावेडी नाका, अहिल्यानगर.

Dayanand Group

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या
पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar®
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीन्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२(६+६) | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ११.०६.२०२६ | अंक नं. ०६१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# बुरुडगाव रस्त्यावरील वकिलाच्या कार्यालयात चोरी, रोकड लंपास

नगर – शहरातील बुरुडगाव रस्ता परिसरातील वैभव हॉटेल शेजारील यश अपार्टमेंटमध्ये असलेल्या एका वकिलाच्या कार्यालयाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने ३८ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना ९ जून रोजी सायंकाळी ७ ते १० जून रोजी दुपारी १२.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत वकील सुधीर विष्णुपंत टोकेकर (वय ६०, तपोवन रोड, सावेडी) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. टोकेकर यांचे वैभव हॉटेलसमोरील यश अपार्टमेंटमध्ये पक्षकारांसाठी कार्यालय आहे. या ठिकाणीच विविध कामगार संघटना तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कामकाजही चालते. ९ जूनच्या सायंकाळी ७ ते १० जूनच्या दुपारी १२.३० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने या बंद कार्यालयाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने कार्यालयातील कामगार संघटनेच्या कपाटाचे लॉकर उचकटून त्यात ठेवलेले ३६ हजार ५०० रुपये किमतीच्या ५०० रुपयांच्या नोटा आणि १ हजार ५०० रुपयांची चिल्लर नाणी असा एकूण ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संभाजी गायकवाड आणि महिला पोलीस उपनिरीक्षक अमिना शेख यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

या प्रकरणी टोकेकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस नाईक योगिता साळवे करत आहेत. चोरट्यांचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले जात आहे.

# खारे कर्जुने शिवारात बॉम्बचा स्फोट; एका जणाचा मृत्यू तर शेळीही दगावली

नगर – नगर तालुक्यातील खारे कर्जुने शिवारात लष्कराच्या सरावावेळी न फुटलेल्या बॉम्बचा अचानक स्फोट होवून त्या परिसरात शेळ्या चारण्यासाठी गेलेल्या एकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना १० जून रोजी दुपारी घडली. या स्फोटात एक शेळी ही मृत्युमुखी पडली असून एक शेळी जखमी झाली आहे. संजय दशरथ गायकवाड (वय ५२, रा. खारे कर्जुने, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.

मयत गायकवाड हे वीट भट्टीवर मजुरी काम करत होते, तर त्यांच्या कडे काही शेळ्या ही पाळलेल्या होत्या. वीट भट्टीवर काम नसल्यास ते इतर ठिकाणी मजुरी करायचे तर कधी शेळ्या चारायला घेवून जायचे. खारे कर्जुने गावच्या जवळच लष्कराचे के.के. रेंज हे युद्ध सराव क्षेत्र आहे. या ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून युद्ध सराव सुरु होता. त्याबाबत लष्कराच्या वतीने ग्रामपंचायतला माहिती देण्यात आली होती. त्यामुळे ग्रामपंचायत ने ध्वनीक्षेपकावर ग्रामस्थांना के.के. रेंज परिसराकडे न जाण्याच्या सूचनाही दिलेल्या होत्या.

मात्र तरीही मयत गायकवाड हे शेळ्या चारण्यासाठी त्या भागाकडे गेले, शेळ्या चारत असताना त्यांना लष्करी सरावावेळी न फुटलेला बॉम्ब दिसला. त्यांनी तो निकामी झालेला असावा असे समजून उचलला आणि दगडावर ते तो आदळू लागले. त्याच वेळी त्या बॉम्बचा अचानक स्फोट झाला. त्यात गायकवाड हे जागीच ठार झाले. त्यावेळी तेथे असलेली १ शेळी ही दगावली तर १ शेळी जखमी झाली. स्फोटाच्या आवाजाने काही नागरिकांनी तेथे धाव घेत पोलिसांना व गायकवाड यांच्या नातेवाईकांना माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. मयत गायकवाड यांच्या मृतदेहाचे जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत गायकवाड यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, सून, भाऊ असा परिवार आहे.

# नोकरीच्या बहाण्याने १४ लाख २० हजारांची फसवणूक; स्टेट बँक आणि आश्रमशाळेची दिली बनावट नियुक्ती पत्रे

नगर – नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका तरुणाची तब्बल १४ लाख २० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना नगरमध्ये उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे त्या तरुणाने आरोपींकडे जास्त तगादा लावल्यावर त्याला चक्क स्टेट बँक तसेच एका आश्रम शाळेचे बनावट नियुक्ती पत्रे देण्यात आली होती. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात ६ जणांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बोल्हेगाव येथील विठ्ठल रेवन्नाथ पाटेकर (वय ३२) या तरुणाने तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी मंगेश मार्शल भिंगारदिवे, उषा मंगेश भिंगारदिवे (दोघे रा. भिस्तबाग चौक), नितीन बाळासाहेब जाधव (रा. अहिल्यानगर), कालिदास बेळगे (रा. पाथर्डी), दिवाकर साही (रा. पिंपळे गुरव, पुणे) आणि बाळासाहेब केदार (रा. मतीमंद मुलांच्या निवासी शाळेजवळ, तपोवन रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी विठ्ठल पाटेकर यांची ओळख टायपिंग क्लासला जात असताना मंगेश भिंगारदिवे याच्याशी झाली होती. मंगेशने आरोग्य विभागात लॅब टेक्निशियनची नोकरी लावून देतो असे सांगून विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी मिळून वेगवेगळ्या टप्प्यांवर पाटेकर यांच्याकडून ३ लाख ८० हजार ऑनलाईन आणि १० लाख ४० हजार रोख असे एकूण १४ लाख २० हजार रुपये घेतले. नोकरीचे काम न झाल्याने पाटेकर यांनी पैशांची मागणी केली असता, आरोपींनी त्यांना स्टेट बँक ऑफ इंडिया आणि नंतर एका निवासी शाळेचे खोटे नियुक्ती आदेश (ऑर्डर) देऊन त्यांची फसवणूक केली.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पाटेकर यांनी पैशांसाठी तगादा लावला. त्यावर आरोपींनी त्यांना वारंवार धमकावले आणि खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली. त्यानंतर पाटेकर यांनी १० जून रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. महिला स.पो.नि.कल्पना चव्हाण पुढील तपास करत आहेत.

## गळफास घेत आत्महत्या

नगर – एका शेतकऱ्याने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील खारे कर्जुने येथे १० जून रोजी दुपारी उघडकीस आली आहे. वसंत जगन्नाथ दरंदले (वय ४३, रा.खारे कर्जुने, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.


वसंत दरंदले (मयत)

वसंत यांनी घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. रुग्णालयातील मेडिकल ऑफिसर डॉ. चोभे यांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतचा अहवाल एमआयडीसी पोलिसांना पाठविण्यात आला. त्यावरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मयत दरंदले यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे. दरंदले यांनी आत्महत्या का केली, याचा तपास पोलिस करत आहेत.

# रस्त्याच्या कामात अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांवर मनपाचा बुलडोझर

## पक्की रहिवासी बांधकामे, व्यापारी गाळे केली जमीनदोस्त

नगर – शहरातील भिंगारवाला चौक ते सर्जेपुरा या रस्त्याच्या सिमेंट काँक्रीटीकरणाच्या कामात अडथळा ठरणाऱ्या सर्जेपुरातील अतिक्रमणांवर महापालिकेने १० व ११ जून रोजी बुडडोझर चालवला. यात काही पक्की रहिवासी बांधकामे, व्यापारी गाळे भुईसपाट करण्यात आली.




सर्जेपुरा येथील अतिक्रमणे बुलडोझर व जेसीबीने हटविताना महापालिकेचे अतिक्रमणविरोधी पथक.

भिंगारवाला चौक ते सर्जेपुरा हा रस्ता बाजारपेठेत जाणारा शहरातील महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाल्याने रस्ता अत्यंत अरुंद झाला होता. यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा ठरत होता. त्यातच नगरोत्थान योजनेच्या १५० कोटींच्या निधीतून शहरात २३ रस्त्यांचे काम हाती घेण्यात आले आहे. सर्जेपुरा येथील रस्त्याचे कामही याच योजनेतून सुरु झाले आहे. मात्र, या भागातील अतिक्रमणांमुळे सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याचे काम रखडले होते. त्यामुळे शहराच्या विकासकामांत अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. त्यानुसार १० जून व ११ जून रोजी सर्जेपुरा येथे महापालिकेने अतिक्रमण हटाव मोहिम सुरु केली. या मोहिमेत ३ रहिवासी घरे आणि ५ ते ६ दुकानांचे अनधिकृत बांधकाम आढळून आले. महापालिकेच्या पथकाने ३ रहिवासी बांधकामे आणि ४ दुकानांचे गाळे बुलडोझरच्या साहाय्याने जमीनदोस्त केले. यामुळे या रस्त्याचे अर्धवट राहिलेले काम आता वेगाने पूर्ण होण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

या कारवाईच्या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप यांनी संबंधित अतिक्रमणधारकांना कामात अडथळा न आणण्याचा निर्वाणीचा इशारा दिला होता. त्यामुळे अतिक्रमणधारकांनीही या अतिक्रमण हटाव मोहिमेस विरोध दर्शविला नाही. त्यामुळे महापालिकेने वेगाने अतिक्रमणे हटवून रस्त्यांच्या कामातील अडथळे दूर केली. सर्जेपुरा येथील अतिक्रमणे हटल्यामुळे नवीन कामात हा रस्ता आता रुंद होणार आहे. यामुळे सर्जेपुरात वाहतुकीला होणारा अडथळा कमी होवून नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे. रस्ता चांगला झाल्यामुळे शहरातील व्यापारालाही चालना मिळणार आहे.

## बाळासाहेब गाडेकर यांचे अपघाती निधन

नगर – पोखर्डी (ता.जि.अ.नगर) येथील रहिवासी बाळासाहेब नारायण गाडेकर (वय ५५) यांचे १० जून रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पोखर्डी अरमधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुना, भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. शुभम गाडेकर यांचे ते वडील होत.

## मारुती ढगे यांचे दु:खद निधन

नगर – निमगाव खलु (ता.श्रीगोंदा) येथील मारुती दादा (बाळासाहेब) बाजीराव ढगे (वय ६३) यांचे ११ जून रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर निमगाव खलु भिमानदी काठावरील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.




त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. निलेश व राम यांचे ते वडील होत.

## संजय लहाडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – पुणे येथील रहिवासी संजय अवधूत लहाडे (वय ६२) यांचे ११ जून रोजी सकाळी ६ वा. अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सिंहगड रोड स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. अहिल्यानगरमधील शिरीष लहाडे यांचे ते बंधू होत.

स्कूल बॅग्ज्
भरपूर व्हरायटीज । रिजनेबल रेट

* रु.२०० पासून रु.१५०० पर्यंत
* रु. १००० पुढील किंमतीचे स्कूल बॅगवर ३० ते ५० टक्केपर्यंत सूट तसेच दै. नवा मराठातील या जाहिरातीचे कात्रण किंवा फोटो घेऊन येणारास अजून रु.१०० सूट
* टिफीन बॅग, स्कूल पाऊच उपलब्ध.
वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

# धार्मिक सहलीचे आमिष दाखवून टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स चालकाकडून नगरमधील ज्येष्ठ नागरिका व महिलांची लाखो रुपयांची फसवणूक

नगर – टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स चालकाकडून धार्मिक सहलीचे आमिष दाखवून नगर शहरातील ज्येष्ठ नागरिकांची आणि महिलांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. वैष्णोदेवी आणि अमरनाथ यात्रेला नेण्याच्या बहाण्याने एका ट्रॅव्हल्स चालकाने भाविकांकडून २ लाख ५६ हजार रुपये गोळा करून सहलीला न नेता त्यांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत स्मिता अनिल शितोळे (वय ६०, रा. पाईपलाईन रोड, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. वडगाव गुप्ता येथील दिनेश पोपट भोर याने त्याच्या बाबा अमरनाथ टूर अँड ट्रॅव्हल्स या व्यवसायाची माहिती देऊन लोकांचा विश्वास संपादन केला. त्याने फिर्यादी स्मिता शितोळे आणि त्यांच्या पतीला या धार्मिक सहलीत हेलिकॉप्टर व इतर चांगल्या सुविधा देण्याचे आमिष दाखवले. वैष्णोदेवी, अमरनाथ यात्रेचे बुकिंग सुरू असल्याचे सांगून त्याने फिर्यादी शितोळे यांच्यासह त्यांच्या परिचयातील इतर लोकांकडून पैसे गोळा केले. या सर्वांनी विश्वासाने वेळोवेळी ऑनलाईन पद्धतीने दिनेश भोर याला एकूण २ लाख ५६ हजार रुपये पाठवले.

पैसे घेतल्यानंतर काही दिवसांनी आरोपी दिनेश भोर याने तेथील हवामान खराब असल्याचे आणि हेलिकॉप्टर सेवा बंद असल्याचे कारण सांगून सहलीला नेण्यास टाळाटाळ सुरू केली. फिर्यादी व त्यांच्या समवेतच्या नागरिकांनी आपले पैसे परत मागितले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली आणि पैसे परत केले नाहीत. या दरम्यान संशयित आरोपीकडे टूर अँड ट्रॅव्हल्सचा कोणताही अधिकृत परवाना (लायसन्स) नसून त्याने लोकांची शुद्ध फसवणूक केल्याचे समोर आले.

या फसवणुकीबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीनंतर आरोपी दिनेश भोर याच्या विरुद्ध १० जून रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भूसंपादन नुकसानभरपाई मंजुरीसाठी लाचेची मागणी

## महसूल सहाय्यकासह कंत्राटी कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल

नगर – राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीच्या नुकसानभरपाईची रक्कम मंजूर करून देण्यासाठी १ लाख २० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आणि एका कंत्राटी कर्मचार्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महसूल सहाय्यक मंगेश विजय ढुमणे (सध्या नेमणूक जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर) आणि कंत्राटी कर्मचारी अमोल कानिफनाथ खामकर (उपविभागीय अधिकारी कार्यालय, श्रीगोंदा-पारनेर विभाग) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांच्या मालकीची मौजे जंगलेवाडी (ता. श्रीगोंदा) येथील १४३ गुंठे जमीन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ -डी वरील रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पासाठी शासनाने संपादित केली होती. या भूसंपादनाच्या बदल्यात तक्रारदारांना अतिम व पुरवणी अवॉर्डनुसार सुमारे १ कोटी ४७ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर झाली होती. मात्र, या रकमेतील प्रलंबित निधी मिळण्यासाठी आवश्यक असलेली एफ.टी.ओ. (फंड ट्रान्स्फर ऑर्डर) मंजूर करून देण्याच्या प्रक्रियेत संशयित आरोपींनी लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संशयितांनी वेळोवेळी पैशांची मागणी केली होती. तसेच ४ मे रोजी महसूल सहाय्यक मंगेश ढुमणे याने व्हॉट्सअॅप कॉलव्दारे तक्रारदारांशी संपर्क साधून १ लाख २० हजार रुपयांची मागणी केली. पैसे दिल्यास एफ.टी.ओ. तात्काळ मिळेल आणि मंजुरीसाठी वरिष्ठ अधिकार्यांनाही पैसे द्यावे लागतील, असे संशयिताने सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या तक्रारीची गंभीर दखल घेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ६ मे रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली.

या पडताळणीत मंगेश ढुमणे आणि अमोल खामकर यांनी तक्रारदारांची नुकसानभरपाईची रक्कम मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेली एफ.टी.ओ. मंजुरी मिळवून देण्याच्या मोबदल्यात १ लाख २० हजार रुपयांची लाच मागितल्याचे आणि ती स्वीकारण्यास सहमती दर्शविल्याचे स्पष्ट झाल्याने या दोघांच्या विरुद्ध पोलीस निरीक्षक छाया देवरे यांच्या फिर्यादी वरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कामरगाव येथील दर्ग्याची समाजकंटकांकडून तोडफोड

## धार्मिक भावना दुखावल्याने नागरिकांमध्ये संताप, आरोपींचा तातडीने शोध घेण्याची मागणी

नगर – नगर तालुक्यातील कामरगाव शिवारात डोंगरावर असलेल्या प्रसिद्ध शहारबशा बाबा दर्ग्याच्या आवारात शिरून अज्ञात समाजकंटकांनी तोडफोड केल्याची घटना १० जून रोजी दुपारी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या समाजकंटकांचा तातडीने शोध घेण्याची मागणी होत आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस प्रशासनाने आरोपींचा शोध सुरू केला आहे.

दर्ग्याचे पुजारी व महम्मद सलीम गफुर शेख (वय ५५, रा. कामरगाव, ता.नगर) यांनी या संदर्भात फिर्याद दिली आहे. कामरगाव येथील डोंगरावर शहारबशा बाबा यांचा दर्गा आहे. कोणीतरी अज्ञात समाजकंटकांनी ९ जून रोजी सायंकाळी ५ ते १० जून दुपारी ४ वाजेच्या कालावधीत दर्ग्याच्या आवारात बेकायदेशीर प्रवेश केला. त्यांनी दर्ग्याचे ५ मिनार, कळस, कमान तसेच गाभाऱ्यातील शहारबशा बाबांच्या मजार आणि समाधीची मोठी तोडफोड केली. हिंदू आणि मुस्लिम दोन्ही धर्मीयांच्या धार्मिक भावना दुखावण्याच्या आणि समाजात तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने ही विटंबना करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्यासोबत नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे आणि पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे यांनीही पथकासह भेट देऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात समाजकंटकांविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम १९६ आणि २९८ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे करत आहेत.

# बायपास रस्त्यावर वाहन चालकाला ५५ हजारांना लुटले

नगर – केडगाव ते निंबळक बायपास रोडवर नेप्ती टोलनाका परिसरामध्ये एका वाहनचालकाला अडवून तू जुगारात पैसे हरला असल्याचे खोटे सांगून त्याला तब्बल ५५ हजार रुपयांना लुटण्यात आले आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चार जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत राजकुमार मस्तराम यादव (वय २८, मूळ रा. सुल्तानपूर, उत्तर प्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे निंबळक एमआयडीसीकडून केडगाव बायपासच्या दिशेने जात होते. यावेळी नेप्ती टोलनाक्याजवळ चार अज्ञात इसमांनी त्यांना गाठले. 'तू जुगारात पैसे हारला आहेस' असे खोटे सांगून आरोपींनी राजकुमार यांना जाळ्यात ओढले. त्यानंतर आरोपींनी त्यांच्याकडून ६ हजार रुपये रोख, मोबाईलमधील फोन पे या पद्वारे ९ हजार रुपये आणि एटीएममधून ४० हजार रुपये काढून घेतले. अशा प्रकारे एकूण ५५ हजार रुपयांची फसवणूक करून आरोपींनी तिथून पळ काढला. या घटनेनंतर राजकुमार यादव यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी याप्रकरणी ४ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून अज्ञात ठगांचा शोध सुरू केला आहे.

# एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नंदुरबार येथे १२ व १३ जूनला राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशनाचे आयोजन

## पेन्शन, ईपीएस-९५ आणि भविष्यातील आंदोलनाच्या दिशेवर होणार चर्चा; अहिल्यानगर जिल्ह्यातील सेवानिवृत्तांनी सहभागी व्हावे



नगर – राज्य परिवहन कर्मचारी संघटनेच्या वतीने एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे दोन दिवसीय राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन १२ व १३ जून रोजी नंदुरबार येथे आयोजित करण्यात आले आहे. संघटनेचे सरचिटणीस सदानंद विचारे यांच्या नेतृत्वाखाली आणि कार्याध्यक्ष श्रीराम गालेवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या अधिवेशनात राज्यभरातील हजारो सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी होणार असून, पेन्शन, ईपीएस-९५, संघटनेची भावी वाटचाल आणि आंदोलनात्मक भूमिका यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

राज्याची 'दक्षिण काशी' म्हणून ओळख असलेल्या नंदुरबार येथील गजानन महाराज मंदिर, कोकणी हिल बसस्टॉपजवळ या ठिकाणी हे अधिवेशन पार पडणार आहे. या अधिवेशनात अहिल्यानगर जिल्ह्यातील एसटी सेवानिवृत्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन बलभीम कुबडे, गोरख बेळगे, गंगाधर कोतकर, अर्जुन बकरे आणि विठ्ठल देवकर यांनी केले आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात गेल्या वर्षभरात झालेल्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठका, उच्चाधिकार समितीच्या सभा, पेन्शन समितीच्या बैठका तसेच विविध प्रादेशिक चिंतन मेळाव्यांमधील निर्णयांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. संघटनेच्या कार्याचा लेखाजोखा मांडण्याबरोबरच आगामी काळातील धोरणात्मक दिशा निश्चित करण्यावरही भर दिला जाणार आहे. याशिवाय सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठीच्या केंद्रीय कार्यकारिणीला मंजुरी देणे, पेन्शन विषयातील अभ्यासू व अनुभवी सेवानिवृत्तांची समित्यांवर निवड करणे आणि संघटनेच्या विविध उपक्रमांबाबत निर्णय घेणे या महत्त्वाच्या बाबींवर चर्चा होणार असल्याची माहिती बलभीम कुबडे यांनी दिली.

एसटी प्रशासन आणि भविष्य निर्वाह निधी कार्यालयामध्ये ईपीएस-९५ संदर्भातील प्रशासकीय शुल्काच्या प्रश्नावर सध्या न्यायालयीन लढाई सुरू आहे. या संदर्भात संघटनेने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच मुख्य विधी सल्लागार यांच्याशी सातत्याने चर्चा सुरू ठेवली असून, या समस्येवर मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सरचिटणीस सदानंद विचारे यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, राज्यातील अनेक विभागांमध्ये पेन्शनचे दावे प्रलंबित आहेत. ऑक्टोबर २०२५ पासून भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने प्रशासकीय शुल्क संगणकीय पद्धतीने भरण्याची अट घातल्यामुळे अनेक सेवानिवृत्तांची पेन्शन प्रक्रिया रखडली आहे. परिणामी अनेक पात्र कर्मचारी अद्याप पेन्शनपासून वंचित आहेत.

महामंडळाला प्रशासकीय शुल्क न भरण्याबाबत न्यायालयाने आदेश दिलेले असतानाही भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून त्या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याची खंत विचारे यांनी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, न्यायालयीन निर्दे शांकडे दुर्लक्ष करून आडमुठेपणाचे धोरण अवलंबले जात असल्याने महामंडळाने संबंधित कार्यालयाविरोधात अवमान याचिकाही दाखल केली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पाठपुरावा संघटना सातत्याने करत असून, आवश्यक असल्यास भविष्यात आंदोलनात्मक भूमिका घेण्याबाबतही या अधिवेशनात चर्चा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वर्षभरासाठी मोफत प्रवासाचा एसटी पास मिळवून देणे हे संघटनेचे मोठे यश असल्याचेही सदानंद विचारे यांनी नमूद केले. या ऐतिहासिक निर्णयासाठी संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष व माजी आमदार कै. गिरीश बापट, कै. भोयर (जालना), डी. टी. जाधव, किसनराव महेंद्रकर, कै. सुधाकर गुजराथी (नाशिक) तसेच कै. रमेश गवळी (अहिल्यानगर) यांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

राज्यभरातील सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना कटिबद्ध असून, नंदुरबार येथे होणारे हे अधिवेशन आगामी काळातील संघटनात्मक धोरण निश्चित करणारे आणि सेवानिवृत्तांच्या हक्कांसाठी महत्त्वाचे ठरणार असून, यामध्ये सहभागी होण्याचे म्हटले आहे.

# बेलेश्वर मंदिरात विटंबना करणाऱ्या आरोपीचा धर्म न बघता गुन्हा दाखल करा : एमआयएम

## घटनेचा जाहीर निषेध, सखोल चौकशी करावी



डॉ. परवेज अशरफी

नगर – भिंगार येथे जातांना बेलेश्वर मंदिर येथे अनेक भाविक दररोज पूजा अर्चना आणि दर्शनासाठी येत असतात. ८ जुन रोजी एक तरुण बूट घालून मंदिरात घुसतो आणि महादेवाच्या पिंडावर स्वतःचा बुटा सहीत पाय ठेवतो. सदर घटना हि खूप निंदणीय असून समस्त भारतीय समाजा तर्फे आम्ही या घटनेचा जाहीर निषेध करत आहे. सदर घटनेत जो आरोपी पकडण्यात आला आहे आपण त्याच्यावर जात किंवा त्याचा धर्म न पाहता गुन्हा दाखल करून त्याची सखोल चौकशी करून कारवाई करावी आणि सर्व हकीकत जनते समोर आणावी असे निवेदन एम आय एम तर्फे जिल्हा पोलिस अधिक्षक यांना देण्यात आले आहे. शहरात मागील काही दिवसात घडलेल्या घटना, मुस्लिम समाजा विरोधात करण्यात येणारे षडयंत्र असल्याचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी सांगितले.

डॉ. परवेज अशरफी पुढे म्हणाले की देशात काही दंगलखोर संघटन सातत्याने मुस्लिम समाजाला बदनाम करण्याचे हेतूने बुरखा घालून काही कृत्य करताना पोलिसांनी पकडले आहे. नगर मध्ये देखील मागील काही दिवसापासून मुस्लिम समाजाला बदनाम करण्याच्या हेतूंनी घटना घडवण्यात आले आहे. गंगा उद्यानात बुरखा परिधान करून नमाज पठन करने आणि आता बेलेश्वर मंदिरात महादेवाची विटंबना करने हे सर्व प्रकार कुठेतरी एकमेकांशी जुडले असल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे. काही जातीवादी दंगलखोर संघटना नगर शहर आणि जिल्ह्याचे वातावरण खराब करून शांतता भंग करण्याच्या उद्देशाने कट रचत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

काही संघटना विटंबना ही मुस्लीम समाजाच्या लोकांनी केली असल्याचे चित्र तयार करत आहे. पोलिसांनी आरोपीचा नाव आणि त्याची जात, धर्म जनतेसमोर आणावी जेणेकरून अशा घाणेरडा कृत्य करणाऱ्यांचा मुस्लिम समाजाशी काही संबंध नाही. ज्यामुळे मुस्लिम समाजाची होणारी बदनामी थांबेल. पोलिसांनी पकडलेल्या आरोपी मागचा सूत्रधार शोधणे शहरात आणि जिल्ह्यात शांतते साठी गरजेचे आहे. पोलिसांनी या तिन्ही घटनेची सखोल चौकशी केल्यास केलेल्या तक्रारीत तथ्य असल्याचे निदर्शनास येईल असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बेलेश्वर मंदिर घटनेत अद्याप कोणताही गुन्हा नोंदवण्यात आलेले नसल्याने गुन्हा दाखल न करण्याचे कारण अद्याप समोर आले नाही. पोलिस प्रशासन या घटनेकडे कसे बघतात व वागतात याकडे जनतेचे लक्ष लागले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव; एसटी को-ऑप बँकेतर्फे निवृत्तांचा सपत्निक सत्कार

## लाखो प्रवाशांच्या जीवनाशी जोडलेल्या एसटी महामंडळाला बळकटी देण्याऱ्या सेवानिवृत्तांचा सन्मान

नगर – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या दीर्घ, प्रामाणिक आणि समर्पित सेवेला मानवंदना देण्यासाठी एस.टी. को-ऑप बँक लि.च्या अहिल्यानगर व श्रीरामपूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एसटी महामंडळातील विविध आगारातून निवृत्त झालेल्या सुमारे ६० कर्मचाऱ्यांचा सपत्निक सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश भारती, कामगार अधिकारी बाळासाहेब एकशिंगे तसेच एसटी बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक व प्राथमिक शिक्षक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत जगताप उपस्थित होते.



एस.टी. को-ऑप बँक लि.च्या अहिल्यानगर व श्रीरामपूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

एसटी को-ऑप बँकेचे संचालक बालाजी शिंदे आणि प्रवीण जाधव यांच्या हस्ते निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारप्रसंगी निवृत्त कर्मचाऱ्यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक सलाम केला. याशिवाय एसटी बँकेचे शाखा व्यवस्थापक, कर्मचारी, एसटी सेवानिवृत्त कर्मचारी संघटना आणि एसटी मधील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. संचालक बालाजी शिंदे म्हणाले की, एसटी महामंडळ ही केवळ वाहतूक व्यवस्था नसून लाखो प्रवाशांच्या जीवनाशी जोडलेली सेवा आहे. या सेवेला बळकटी देण्यासाठी आपल्या सर्व निवृत्त सहकाऱ्यांनी आयुष्यभर परिश्रम घेतले. आज आपण ज्या ठिकाणी आहोत, त्यामागे त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या सेवेला सलाम करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संचालक प्रवीण जाधव म्हणाले की, सेवानिवृत्त कर्मचारी हे संस्थेची खरी संपत्ती असतात. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ पुढील पिढीला मिळणे आवश्यक आहे. एसटी को-ऑप बँकेच्या सभासदांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे सांगितले.

एसटी बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक सुर्यकांत जगताप यांनी नोकरीतील निवृत्ती हा शेवट नसून जीवनातील एका नव्या पर्वाची सुरुवात असते. सेवाकाळात मिळवलेला अनुभव, शिस्त आणि कार्यनिष्ठा हीच निवृत्तीनंतरची सर्वात मोठी संपत्ती असते. निवृत्त कर्मचाऱ्यांनी सामाजिक कार्य, कुटुंब आणि आरोग्य यांना प्राधान्य देत आनंदी जीवन जगण्याचा त्यांनी सल्ला दिला.

कार्यक्रमात बोलताना संचालकांनी निवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्याने सोडविण्याची ग्वाही दिली. तसेच बँकेच्या माध्यमातून सभासदांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. यावेळी दोन्ही संचालकांनी एसबीआयच्या नियमांनुसार सभासदांसाठी विना जामीन कर्ज योजना तसेच विमा सुरक्षा योजना लवकरात लवकर लागू करण्याचे आश्वासन दिले.

उपस्थितांनी आपल्या मनोगतात निवृत्त कर्मचाऱ्यांनी एसटी महामंडळाच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. निवृत्तीनंतरचे जीवन आनंदी, निरोगी आणि समाधानकारक जावे, अशा शुभेच्छाही यावेळी देण्यात आल्या.

सूत्रसंचालन राजेंद्र टाक यांनी केले. शाखा व्यवस्थापक भालसिंग यांनी आभार मानले.

# अहिल्यानगरात १३ जून रोजी पेन्शनरांच्या प्रश्नांसाठी 'संकल्प मेळावा'

## विधान परिषदेचे सभापती राम शिंदे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती

नगर – सेवानिवृत्त कर्मचारी व पेन्शनरांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनच्या वतीने शहरात 'संकल्प मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. १३ जून रोजी टिळक रोड येथील नंदनवन लॉन येथे हा मेळावा होणार असून, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी तसेच जिल्हाभरातील हजारो पेन्शनर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

विधान परिषदेचे सभापती ना. प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळाव्यास जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पेन्शनरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना शासन आणि प्रशासनाच्या पातळीवर न्याय मिळावा, त्यांच्या विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधले जावे आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ठोस भूमिका निश्चित व्हावी, हा या संकल्प मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील निवृत्त कर्मचारी, शिक्षक, अधिकारी तसेच महिला पेन्शनर या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनचे अध्यक्ष द. मा. ठुबे गुरुजी, कार्याध्यक्ष रावसाहेब पवार, सरचिटणीस बन्सी उबाळे यांनी केले आहे. पेन्शनरांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि त्यांच्या प्रश्नांना एकत्रितपणे आवाज देण्यासाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या मेळाव्यास जिल्ह्यातील विविध मतदारसंघांचे आमदारही उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये आमदार संग्राम जगताप, आशुतोष काळे, मोनिकाताई राजळे, काशिनाथ दाते, सत्यजित तांबे, डॉ. किरण लहामटे, अमोल खताळ, विक्रमसिंह पाचपुते आणि विठ्ठलराव लंघे यांचा समावेश आहे. याशिवाय जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे तसेच शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांचीदेखील उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे पेन्शनरांना आपल्या समस्या थेट लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची संधी मिळणार आहे.

मेळाव्यादरम्यान विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. आमदार अक्षय कर्डिले, विधान परिषदेचे आमदार प्राजक्त तनपुरे व विवेक कोल्हे तसेच नागपूर विद्यापीठ सदस्य राजेश परजणे यांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

पेन्शनरांच्या विविध मागण्या, निवृत्तीनंतरच्या सुविधा, आरोग्यविषयक प्रश्न, आर्थिक लाभ तसेच शासनाच्या विविध योजनांबाबत चर्चा करून त्यासंदर्भातील निवेदने सादर करण्यात येणार आहेत. त्यामुळे हा मेळावा केवळ स्नेहसंमेलन न राहता पेन्शनरांच्या हक्कांसाठीचा प्रभावी संवाद मंच ठरणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशन जिल्हा कार्यकारिणी, तालुका अध्यक्ष आणि सर्व पदाधिकारी विशेष परिश्रम घेत आहेत.

# नगरमध्ये १२ जूनला 'जिंदगी प्यार का गीत हैं' या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

नगर – असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज संस्थेने १२ जूनला सायंकाळी ६ वा. माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे जिंदगी प्यार का गीत है या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

या कार्यक्रमामध्ये लाईव्ह ऑर्केस्ट्रासह सुरेल संगीताची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे. विशेष म्हणजे, एमआयडीसीमधील उद्योजक तसेच अहमदनगर जिल्ह्यातील प्रतिभावान गायक आपल्या उत्कृष्ट गायनाने कार्यक्रमाची रंगत वाढविणार आहेत.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पूजा इव्हेंट्स यांनी पुढाकार घेतला असून कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व व्यवस्थापन त्यांच्यामार्फत करण्यात येत आहे. तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही या कार्यक्रमाची मुख्य प्रायोजक संस्था आहे.

संगीतप्रेमी नागरिक, रसिक श्रोते तसेच उद्योजक बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा व कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन AAMI कल्चरल कमिटीच्या वतीने प्रफुल्ल पारख, दिलीप अकोलकर आणि राजेंद्र शुक्रे, हेमंत नरसाळे यांनी केले आहे.

हा कार्यक्रम निशुल्क असून कार्यक्रमाची प्रवेश पत्रिका अनिवार्य आहे.

कार्यक्रमाची प्रवेश पत्रिका AAMI कार्यालय, प्लॉट क्र. D-५२, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे उपलब्ध असून माहितीसाठी राजेंद्र कांडेकर (मो. ९०११८७७४७३) यांच्याशी संपर्क साधावा.

# पोस्टल संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी संतोष कदम; जनरल सेक्रेटरीपदी शिवाजी वासू रेड्डी यांची निवड

नगर – डाक विभागातील मान्यताप्राप्त कर्मचारी संघटना नॅशनल असोसिएशन ऑफ पोस्टल एम्प्लॉईज (ग्रुप 'सी') चे २६ वे राष्ट्रीय अधिवेशन ७ ते ९ जून दरम्यान पंजाबमधील जालंधर येथे असलेल्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये उत्साहात पार पडले. या अधिवेशनात देशभरातील २२ पोस्टल सर्कलमधील एक हजाराहून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

अधिवेशनाचे उद्घाटन विद्यापीठाचे चान्सलर तथा राज्यसभा सदस्य डॉ. अशोक कुमार मित्तल यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी भारतीय डाक विभागाच्या विश्वासार्ह सेवेचे कौतुक करत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या राज्यसभेत मांडण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. तसेच लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी परिसरात स्वतंत्र पिनकोडसह कार्यरत असलेल्या पोस्ट ऑफिसमुळे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांचा विशेष उल्लेख केला.

संघटनेचे सरचिटणीस शिवाजी वासू रेड्डी यांनी प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर सविस्तर भूमिका मांडली. महाराष्ट्राच्या वतीने संतोष कदम यांनी मनोगत व्यक्त करताना डाक कर्मचाऱ्यांसमोरील आव्हाने, संघटनेची भूमिका आणि भविष्यातील दिशा यावर भाष्य केले. अधिवेशनाच्या समारोप सत्रात पुढील दोन वर्षांसाठी राष्ट्रीय कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्रातील ठाणे विभागाचे अभ्यासू व संघटनात्मक नेतृत्व म्हणून ओळख असलेले संतोष कदम यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर शिवाजी वासू रेड्डी (आंध्रप्रदेश) यांची जनरल सेक्रेटरीपदी फेरनिवड करण्यात आली. याशिवाय १५ सदस्यीय राष्ट्रीय कार्यकारिणीचीही घोषणा करण्यात आली. या अधिवेशनात महाराष्ट्रातून राज्य कार्याध्यक्ष संतोष यादव (अहिल्यानगर), कमलेश मिरगणे, राजेंद्र विश्वास (श्रीरामपूर), शिवाजी चाफे यांच्यासह अनेक प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

राष्ट्रीय अध्यक्ष संतोष कदम व सरचिटणीस शिवाजी वासू रेड्डी यांचे आशुतोष देशपांडे (नाशिक), धनंजय राऊत (नागपूर), आर. एच. गुप्ता (मुंबई), महादेव गोपाळघरे (मुंबई), काळूराम पारखी (पुणे), सुनील झुंजारराव (ठाणे), प्रकाश कदम (बारामती), शिवाजी नवले (बीड), विकास यादव (अंबाला हरियाणा) आदींनी अभिनंदन केले.



नॅशनल असोसिएशन ऑफ पोस्टल एम्प्लॉईजच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संतोष कदम (महाराष्ट्र) व जनरल सेक्रेटरीं शिवाजी वासू रेड्डी (आंध्र प्रदेश) यांचा सत्कार करताना अहिल्यानगर पोस्टल संघटनेचे संतोष यादव. समवेत महादेव गोपाळघरे, धनंजय राऊत, शिवाजी नवले आदी.





अहमदनगर पोस्टल सोसायटीची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली, यामध्ये सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी आ. अक्षय कर्डिले व आ. संग्राम जगताप आदी.

# अहमदनगर पोस्टल सोसायटीची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव; पोस्टल कर्मचाऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडविणारी संस्था : आ. संग्राम जगताप

नगर – अहमदनगर पोस्टल सोसायटीची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन रामेश्वर ढाकणे यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगरमध्ये उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमात आमदार अक्षय कर्डीले यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीस व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार कर्डीले यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले, पोस्टल सोसायटीने केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था न राहता सभासदांच्या कल्याणाचा विचार करणारी संस्था म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. १०६ वर्षांची परंपरा ही संस्थेच्या पारदर्शक कारभाराची आणि सभासदांच्या विश्वासाची पावती आहे.

आमदार अक्षय कर्डीले म्हणाले, अहिल्यानगर जिल्हा हा सहकाराची पंढरी म्हणून ओळखला जातो. सध्याच्या स्पर्धेच्या काळात सहकारी संस्था टिकविणे आव्हानात्मक असताना पोस्टल सोसायटीने १०६ वर्षे यशस्वी वाटचाल करणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले.

यावेळी अहिल्यानगरचे आय पी.ओ. एस अधीक्षक विकास पालवे यांनी पोस्टल विभागातील बदलत्या काळाची गरज आणि कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, पोस्ट विभाग हा देशाच्या सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेला विश्वासाचा दुवा आहे. या विभागातील कर्मचाऱ्यांच्या हितासाठी पोस्टल सोसायटी सातत्याने करत असलेले काम कौतुकास्पद आहे. आर्थिक शिस्त, सभासदांचा विश्वास आणि व्यवस्थापनाची पारदर्शकता यामुळे संस्था आजही सक्षमपणे उभी असल्याचे म्हटले.

सभेत संस्थेचे कार्यकारी संचालक प्रफुल्लकुमार काळे यांनी संस्थेच्या आर्थिक स्थितीचा आढावा सादर केला. कर्जवसुली नियमित होत असल्याने संस्थेची आर्थिक घडी मजबूत असून संस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेने यावर्षीही ऑडिट 'अ' वर्ग कायम ठेवला असून सभासदांना कायम ठेवींवर ११ टक्के व्याज व शेअर्सवर ७ टक्के लाभांश देण्यात आला आहे. यावेळी वरिष्ठ पोस्टमास्तर अमृत कुमटकर, ऑल इंडिया पोस्टल एम्प्लॉईज ग्रुप-सीचे जनरल सेक्रेटरी सुरेंद्र पालव, मुंबई सोसायटीचे मानद सचिव महेश सावंत, सहाय्यक डाक अधीक्षक बाळासाहेब बनकर, अमित देशमुख, पोस्टल सोसायटीचे व्हाईस चेअरमन सुनील कुलकर्णी, निसार शेख, महेश तामटे, प्रमोद कदम, सलीम शेख, स्वप्ना चिलवर, अर्चना दहिंडे, संस्थेचे सभासद सतीश येवले, सचिन अस्वर, संदीप मिसाळ, सुखदेव पालवे, धनंजय दैठणकर, कविश्वर ताकपेरे, राजेंद्र राहिंज, सचिन गायकवाड, गणेश केसकर, अमोल बोरुडे, अंबादास सुद्रीक, बलराम दाते, सुनील चांडोले, कैलास भुजबळ, गोरक्ष आचार्य, जय मडावी, अर्जुन जटाळे, शंकर कडभणे, हर्ष कांबळे, आजीनाथ खेडकर, सुनील जाधव, सागर जाधव, शुभांगी मांडगे, ज्योती कांबळे, पदमराज पडलवार, संतोष झावरे, संचिता गाडे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्लकुमार काळे यांनी केले. प्रमोद कदम यांनी आभार मानले.

# धम्माल मनोरंजन

**सुविचार**



राष्ट्रीय ग्रंथ, राष्ट्रीय पुरुष आणि राष्ट्रीय परंपरा हे सर्व राष्ट्राचे जीवन होय.

## दिनविशेष १२ जून

१९०५ : गोपाळकृष्ण गोखले यांनी सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना केली.

१९१३ : जॉन ब्रे या अमेरिकन माणसाची जगातील पहिली कार्टून फिल्म रिलीज़ झाली.

१९४० : दुसरे महायुद्ध १३,००० ब्रिटिश आणि फ्रेंच सैनिकांनी मेजर जनरल रोमेलला शरणागती पत्करली.

१९४४ : दुसरे महायुद्ध जर्मन सैन्याने वापरलेला पहिला फ्लाइंग बॉब लंडनला धडकला.

१९६४ : वर्णभेद विरोधी नेते नेल्सन मंडेला यांना जन्मठेपेची शिक्षा झाली.

१९७५ : अलाहाबाद न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द केली आणि त्यांना ६ वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास बंदी घातली.

१९९३ : पृथ्वीक्षेपणास्त्राची ११ वी चाचणी यशस्वी.

१९९६ : भारताचे पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांच्या संयुक्त आघाडी सरकारने लोकसभेत आपले बहुमत सिद्ध केले.

२००१ : कोनेरु हंपी ही बुद्धीबळातील वूमन ग्रँडमास्टर बनली. हा पराक्रम करणारी ती भारताची सर्वात कमी वयाची व एकुणात दुसरी खेळाडू आहे.

२००२ : जागतिक बालकामगार विरोधी दिनाला सुरुवात झाली. जन्म :४९९ : ४९९ई.पुर्व : आर्यभट्ट भारतीय गणिती व खगोलशास्त्रज्ञ यांचा जन्म.१८९४ : पुरुषोत्तम बापट बौद्ध धर्म ग्रंथांचे भाषांतरकार आणि संपादक यांचा जन्म. (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९९१) १९१७ : भालचंद्र दत्तात्रय खेर लेखक व पत्रकार यांचा जन्म. (मृत्यू: २१ जून २०१२)

१९२४ : जॉर्ज बुश अमेरिकेचे ४१ वे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

१९१७ : भालचंद्र दत्तात्रय खेर लेखक पत्रकार यांचा जन्म.

१९५७ : जावेद मियाँदाद पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू प्रशिक्षक यांचा जन्म. १९७२ : भालचंद्र कदम लोकप्रिय महाराष्ट्रीयन मराठी हास्य विनोदी रंगमंच कलाकार व चित्रपट अभिनेता यांचा जन्म. १९८५ : ब्लॅक रॉसफ मोझीला फायरफॉक्स चे सहसंस्थापक यांचा जन्म.

मृत्यू :१९६४ : कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी मराठी भाषेचे गाढे अभ्यासक यांचे निधन. (जन्म: ५ जानेवारी १८९२ इस्लामपूर, सांगली)

१९७६ : गोपीनाथ कविराज भारतीय तत्त्वज्ञ आणि विद्वान यांचे निधन.


१९७८: गुओ मोरुओ चिनी भाषेमधील कवी, लेखक आणि इतिहासकार यांचे निधन.

१९८१ : प्र. बा. गजेंद्रगडकर भारताचे ७ वे सरन्यायाधीश यांचे निधन. (जन्म: १६ मार्च १९०१)

१९८३ : नॉर्मा शिअरर कॅनेडियन अमेरिकन अभिनेत्री यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९०२)

२००० : पु.ल. देशपांडेफ मराठी लेखक, कवी, नाटककार आणि अभिनेता यांचे निधन. (जन्म: ८ नोव्हेंबर १९१९)२००३ : ङ्ग्रेगरी पेकफ हॉलीवूड अभिनेता यांचे निधन. (जन्म: ५ एप्रिल १९१६)२०१५ : ङ्गनेकचंद सैनीफ भारतीय मूर्तिकार यांचे निधन.(जन्म: १५ डिसेंबर १९२४)

## महाशब्दकोडे




### आडवे संकेत

१) दैवामुळे उत्कर्ष व्हावा परंतु स्वत:च्या कृत्यामुळे नुकसान व्हावे अशी स्थिती.
६) दबाव, प्रेशर
८) सर्व, एकूण एक
९) हिंदुचा सर्वात महत्त्वाचा सण.
१२) मोठी बहिण
१३) पटकन
१५) एक खनिज द्रव्य
१६) चिर भेग
१८) दंग
१९) दमयंती
२०) शेषांद्री नावाची नटी
२१) बातमी, वार्ता (हिं.)
२३) माचा, मंडप
२५) शेत, अरण्य
२६) सरस्वती
२७) फणसाचा गाभा
२८) एक मातीचे भांडे
२९) बाहेरच्या विरुद्ध
३०) मोहून टाकणारा
३३) कुत्र्याला भुंकण्याचा आदेश
३४) क्षणिक झंजावत
३५) गडबड, मोठा आवाज
३६) अंग फुगणे
३८) पाठांतर
३९) गोड
४०) आपले एक घाणेंद्रिय
४१) त्रिकुट, त्रिवर्ग
४२) झोक, प्रवृत्ती
४३) हक्क
४४) पश्चिम बंगालची राजधानी
४६) गाईची विष्टा
४७) या पार
४८) स्पर्शमणी
४९) गुढी उभारणे
५०) बुड
५१) साहनी नावाचा जुना हिरो
५२) परंतु
५३) धातुचा दिवा

### उभे संकेत

१) दररोजचे
२) मरण
३) बटाटे
४) कत्तलगृह
५) पुढारीपणा
६) करी काम
७) गुरुवार ८) सत्त्व
१०) एक सच्छिद्र खाद्य पदार्थ
११) खरोखरचे, नियमाला धरुण (इं.)
१४) सनदशीर
१७) पाखरे
१८) नेहरुजी २०) मदन
२२) मातीच्या भावात
२३) गरसोळी
२४) वस्त्रातील रेष
२५) समुद्राला लागलेली आग
२६) शिजविलेले तांदुळ
२९) ओलांडल्यासारखे
३१) विनाकारण
३२) मेल येथून येथे जाते
३५) कोरा
३७) गुजराती लोकांचा नमस्कार
३८) महादेव ४३) महादेव
४५) फार तापलेले
४७) आळ, बालंट

### मागील उत्तर



१) डोळ्याचा रंग कशावर अवलंबून असतो?
अ)शंकुपेशी ब)रजतकनिका क)दंडगोलाकृती पेशी ड)यापैकी नाही

२) मुळ वस्तूच्या हुबेहुब प्रतिकृतीस काय म्हणतात?
अ) बहुरुपीक ब) समजातीये क) हुमीओ मार्फ ड) होलोग्राम

३) खालीलपैकी कोणते एक पिक लागवडीसाठी महाराष्ट्रात सर्व हंगामामध्ये घेता येते?
अ)गहू ब)तूर क)सूर्यफूल ड) हरभरा

४) राज्यपालास पदच्चुद करण्याची तरतूद कोणत्या देशाच्या घटनेवरुन घेण्यात आली?
अ)ऑस्ट्रेलियाब)अमेरिका क)कॅनडा ड) यापैकी नाही

५) पाणी किती सेल्सीअसवर गोठते?
अ)२५ अं.से. ब) ३२ फॅरनहिट क)-३२ फॅरनहिट ड) १ डि.सें.

६) मुडदूस या रोगाच्या उपचारासाठी कोणते औषध वापरतात?
अ)कॉडलिव्हर ऑईल ब)रिफामायसीन
क)सॅफ्रायमायसीन ड) सनफ्रावर ऑईल

७) श्वसनाची क्रिया खालीलपैकी कोणत्या तत्त्वावर आधारीत आहे? अ)ओव्हमच्या ब)बॉईलच्या क)पाश्चरच्या ड)न्यूटनच्या

८) दूरचित्रवाणी हा विषय कशाचे सुचीत आहे?
अ)राज्यसुची ब)केंद्रसुची क)स्वतंत्रसूची ड) समवर्त सुची

९) उपकरणांच्या उपयोगामुळे कोणते फायदे होतात?
अ)निरीक्षणाचे जतन ब)विस्तारीत निरीक्षण क)अचुकता ड)वरील सर्व

१०) जेव्हा दोन सदोष राशी समांतर असतात तेव्हा त्यांचा गुणाकार कसा असतो?
अ)तेवढाच राहतो ब)धन असतो क) ऋण असतो ड) शुन्य राहतो

११) हत्तीची सोंड म्हणजे वस्तुतः त्याचे नाक व खालीलपैकी कोणता अवयव होय?
अ) कपाळ ब)वरचा ओठ क)खालचा ओठ ड) तोंड

१२) आणीबाणीच्या काळात मुलभूत अधिकारांना स्थगीती दिली जाते ते भारतीय संविधानात कोणत्या इतर देशाच्या संविधानातून घेतले आहे?
अ)जर्मनी ब)थायलंड क)वेस्ट इंडिज ड) ऑस्ट्रेलिया

१३)केंद्र व राज्य सरकार यांच्यातील अधिक संबंध कोणी निश्चित करतो?
अ) नियोजन आयोग ब) अर्थमंत्रालय
क)वित्त आयोग ड) पंतप्रधान

१४) क्लोरोफिलमधे खालीलपैकी काय असते?
अ)बेरियम ब)बोरियम क) कॅल्यिशम ड) मॅग्नेशियम

१५) मानवाच्या मोठ्या आतड्यात खालीलपैकी कोणते आदीजीव कायम वास्तव्य करत असतात?
अ)पट्टाकृमी ब)पॅरोशियम क)अमीबा ड)जंत

१६) खालीलपैकी कोणत्या रोग जंतुच्या वंश प्रकारामुळे हृदयाच्या झडपेला सुज येते?
अ)स्टेप्टोकॉक्स ब) सालमोनेला
क)कॉस्टेडियम ड)कोरिनीबॅक्टेरियम

**उत्तरः (१-ब), (२-क), (३-क),(४-ड),(५-ब), (६-अ),(७-ड), (८-ब),( ९-ड), (१०-ड),(११-ब), (१२-अ), (१३-क),(१४-ड ), (१५-अ ),(१६-अ )**

जिंकला. अमेरिकेने दुसरे महायुद्ध अणुबॉम्बच्या सहाय्याने जिंकले. तसे दवांनीही कधी नरसिंहाची नखं वापरली तर कधी मोहीनीची मोहकता वापरली या कथे त दधिचीऋषींची हाडं वापरली. आजही या भूमीला हाडं देणारे दधिची हवेत.... नसतील तर हाडाची काडे करणारे हवेत, तेही नसतील, हाडाचे भारतीय तर हवेतच हवेत. नाही मिळाले तर अर्धी हाडं स्मशानात गेली आहेत म्हणायला हरकत नाही. आजही काही मंडळी आहेत ती जिवंतपणी रक्तदान, व मरणोत्तर नेदत्रदान इतकेच काय मरणोत्तर देहदानही करीत आहेत. पण जिवंतपणी स्वत:हून प्राण सोडून आपली प्रभावशाली हाडे दान करणारे दधिची अजोड आणि अजरामर अगदी हाडाचे दाते होते

### चारोळी

तुझ्या आठवणीचे मेघ
जरी काळजात दाटलेले
अश्रुंचे झरे मात्र
पापणी आड गोठलेले

------------

शुभ-अशुभाच्या गोष्टी
मी ही होत्या झेलल्या
लग्नानंतर फक्त
तुझ्याचसाठी पेलल्या

वडीलः 'जर तू त्या नर्तकीवर प्रेम करायचे सोडून दिले नाहीस, तर तुझा मासिक खर्चच पाठवायचा बंद करीन.'
मुलगाः 'जर तुम्ही माझी मासिक खर्चाची रक्क दुप्पट केली नाहीत, तर मी तिच्याशी लग्न करीन.'


### फळे व आरोग्य — 'गाजराचा रस'


कॅन्सर आणि गाजर रस

तो शरिराच्या बाह्य व आंतरत्वचेमध्ये एक आस्तरण धात असतो. तो शरीराचे रक्षण करीत असतो. शरीररक्षणाप्रमाणेच शरीरातील अतिरिक्त स्त्राव शोषण करणे आणि मळाचा निचरा करणे आदी कामेही हा आस्तरण धातू करतो. इतका महत्त्वाचा हा धातू आहे. या धातूला 'अ' जीवनसत्त्वाची नितांत आवश्यकता असते. या 'अ' जीवसत्त्वाच्या अभावी आस्तरण धातुकोष शुष्क व कठीण होतात. थोडक्यात म्हणजे गंजतात. त्यामुळे शरीरांतर्गत जे स्वाभाविक कार्य घडायला पाहिजे ते होत नाही आणि शरीर व्याधिग्रस्त बनते. विविध रोगांची शिकार बनते. त्यातून अनेक प्रकारचे रोग उद्भवतात. त्वचेचे रोग उद्भवतात, रांताधळेपणा येतो. मूतखडा होतो. क्षयाची बाधा होते. हाडांचा कणखरपणा जाऊन हाडे नरम होतात. दातांचे विकार जडतात.

पोट आणि आतड्याच्या विकारात गाजररस अधिक गुणकारी आहे. ज्यांना मूळव्याध, फिशर यांच्यामुळे गुदव्दाराचा दाह होतो, अशांनी गाजर रस अवश्य घ्यावा.

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१) सन २००३ मध्ये आलेला चित्रपट 'अंदाज'चा नायक.
४) सन २००३ मध्ये आलेला चित्रपट 'जमिन'ची नायीका.
७) तेरी गलीयों में ना रखेंगे कदम आज के बाद...... हे गाण कोणत्या चित्रपटातील आहे.
८) मुराद (खलनायक)
९) जो प्यार करेगा (चित्रपट)
१०) नाडीयाडवाला (निर्माता)
११) दिप्ती (नायीका)
१२) बरस (चित्रपट)
१३) सन १९९२ मध्ये आलेला चित्रपट 'दिवाना'ची नायीका.
१४) दादा (चित्रपट)
१५) सन २००० मध्ये दिग्दर्शक राजकंवरच्या या चित्रपटात बॉबी देओल आणि रानी मुखर्जी होते.
१७) अदनान (गायक)
१८) सन १९९८ मध्ये दिग्दर्शक प्रमोद चक्रवर्तीच्या या चित्रपटात अक्षय कुमार आणि रविना टंडन होते.
२०) की बाजी (चित्रपट)
२१) इशा (नायीका)
२३) एस. (गायीका)
२५) मेहता (दिग्दर्शक)
२६) बलराम (चित्रपट)
२७) शोला और (चित्रपट)
२८) सन १९९५ मध्ये आलेला चित्रपट 'अंगरक्षक'चा नायक.
२९) रिश्ता (चित्रपट)
३०) रेखाचा पहिला नायक.
३३) सन २००१ मध्ये आलेला चित्रपट 'रहना है तेरे दिल में'चा नायक.
३४) मत ले यार (चित्रपट)
३५) सन १९९४ मध्ये दिग्दर्शक महेश भट्टच्या या चित्रपटात अतूल अग्निहोत्री आणि सोनाली बेंद्रे होते.
३६) अजय जडेचाचा पहिला चित्रपट.

### उभे संकेत

२) 'कलाकार' या चित्रपटाचा नायक.
३) ए.आर. (संगीतकार)
४) सन १९८९ मध्ये दिग्दर्शक राजकुमार कोहलीच्या या चित्रपटात मिथून चक्रवर्ती, मिनाक्षी शेषांद्री आणि डिंपल कपाडिया होते.
५) मेरी शादी का खयाल दिल में आया है इसीलिए मम्मीने मेरी तुम्हे चायपे बुलाया है.....
६) सन १९९४ मध्ये आलेला चित्रपट 'हम आपके है कौन'चे दिग्दर्शक.
९) सन १९९९ मध्ये आलेल्या या चित्रपटात सलमान खान, ऐश्वर्या रॉय आणि अजय देवगन होते.
१६) एक प्रसिद्ध गायिका.
१७) सन १९९८ मध्ये आलेला चित्रपट 'बंधन'चा नायक.
१९) चोरोंका राजा (चित्रपट)
२२) हृत्विक रोशनची पत्नी.
२४) मरते है (चित्रपट)
२८) आगा (नायीका)
३१) एक जुने प्रसिद्ध गीतकार.
३२) प्यार का (चित्रपट)
३४) सन १९९० मध्ये इंद्रकुमार दिग्दर्शीत या चित्रपटात आमिर खान आणि माधूरी दीक्षीत होते.

### मागील फिल्मी उत्तर



### घरचा वैद्य

उच्च रक्तचाप (हाय ब्लडप्रेशर)

१. खसखस आणि टरबुजाच्या बियांचा गर वेगवेगळे वाटून समप्रामणात मिसळून ठेवावे. सकाळ संध्याकाळ रिकाम्या पोटी खाल्याने वाढलेला रक्तचाप कमी होतो व रात्री झोप सुद्धा चांगली लागते.

२. एक चमचा मेथीच्या दाण्याचे चूर्ण सकाळ संध्याकाळ रिकाम्या पोटी घेतल्यास (आठवडाभर) उच्च रक्तचाप कमी होतो.

३. मनुका सोबत लसणाची पाकळी खाल्याने आराम होतो.

४. फांदीवर पिकलेली पपई तीस दिवस सकाळी रिकाम्या पोटी खावे, त्यानंतर २ तास काही खाऊ पिऊ नये. ५. गहू व चणे समप्रामणात घेऊन दळून घ्यावे. या पीठाच्या पोळ्या खाव्या. एका आठवड्यात आराम येतो.

### चारोळी

अशीच सोबत तुझी
जन्मभर असू दे
वाटेतील काटेही
फुलेच भासू दे.

# आदिवासी भिल्ल कुटुंबांना घरकुल व शेतीसाठी जागा द्या

## एकलव्य भिल्ल संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – पाथर्डी तालुक्यातील डमाळवाडी, मिरी गावातील भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजातील कुटुंबांना राहण्यासाठी तसेच उदरनिर्वाहासाठी शेती करण्याकरिता शासनाची जागा उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी एकलव्य भिल्ल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. एकलव्य भिल्ल संघटनेचे संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजंता गोलवाड तथा नाशिक विभागाचे सभापती शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी सुनिता माळी, पिवणेश माळी, बबन बर्डे, सयाजी पवार, सविता पवार, राजेंद्र माळी, आसराबाई माळी, रमेश पवार, सुनीता पवार, सोनू दळवी, अनिता दळवी, गंगा पवार, शहाजी पवार, शहादेव पवार, अंकुश पवार, जिजाबाई पवार, बाबासाहेब माळी, भाऊसाहेब पिंपळे, दुर्गा पिंपळे, रामकिसन माळी, शत्रुघ्न माळी, सोनाली माळी, सुनीता माळी, मनीषा माळी, कचरू माळी, कृष्णा माळी, मीरा माळी, विक्रम माळी, आशाबाई माळी, शरद पवार, परमेश्वर पवार उपस्थित होते.



पाथर्डी तालुक्यातील डमाळवाडी, मिरी गावातील भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजातील कुटुंबांना राहण्यासाठी तसेच उदरनिर्वाहासाठी शेती करण्याकरिता शासनाची जागा उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी एकलव्य भिल्ल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डमाळवाडी व मिरी गावात आदिवासी भिल्ल समाजाची अनेक कुटुंबे वास्तव्यास असून त्यांचा प्रमुख व्यवसाय मोलमजुरी आहे. मात्र या कुटुंबांकडे स्वतःची शेती किंवा राहण्यासाठी जागा नसल्याने त्यांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. अनेक कुटुंबांना कायमस्वरूपी निवाऱ्याअभावी भटकंतीचे जीवन जगावे लागत असून मुलांच्या शिक्षणावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आदिवासी भिल्ल समाज हा देशाचा मूळ रहिवासी आणि इतिहासात 'देशाचा राजा' म्हणून ओळखला जातो. मात्र आजही या समाजातील अनेक कुटुंबे भूमिहीन असून त्यांना स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी आवश्यक जागादेखील उपलब्ध नाही. ऊन, वारा आणि पावसाचा सामना करत हे कुटुंबीय अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत आहेत. त्यामुळे शासनाने मिरी गावातील भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजातील कुटुंबांना घरकुलासाठी जागा तसेच शेतीयोग्य जमीन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांची पुन्हा भेट घेऊन समाजाच्या समस्या व मागण्या निदर्शनास आणून देण्यात येणार असल्याचा इशाराही उपलब्ध संघटनेचे मोहन गोलवाड यांनी केला आहे.

# बाजारपेठ बदलत असताना स्थिरतेला महत्त्व का असते?

इक्विटी बाजारपेठ क्वचितच सरळ रेषेत पुढे जाते. मध्यपूर्वेतील भू-राजकीय संघर्षासारख्या अलीकडील घटनांनी आपल्याला याची आठवण करून दिली आहे. असे काही टप्पे असतात जेव्हा मोठ्या, प्रस्थापित कंपन्या (लार्ज-कॅप) बाजारपेठेचे नेतृत्व करतात, तर इतर काळात मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप शेअर्स अधिक चांगला परतावा देतात. फ्लेक्सीकॅप गुंतवणूक या समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करते. व्हॅल्युएशन, वाढीच्या शक्यता, बाजारपेठेतील कल आणि रिस्क-रिवॉर्ड यावर आधारित फ्लेक्सीकॅप फंड लार्ज-कॅप, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप शेअर्समध्ये आपली गुंतवणूक स्थलांतरित करू शकतो. हे महत्त्वाचे आहे, कारण बाजारपेठेच्या विविध चक्रांमध्ये वेगवेगळ्या मार्केट-कॅप



संतोष गांधी

विभागांची वर्तणूक वेगवेगळी असते.

सुधारणाऱ्या बाजारपेठेत, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप शेअर्स अधिक आकर्षक ठरू शकतात. वाढती मागणी, सुधारलेली नफाक्षमता आणि कमाईतील वाढ याचा फायदा लहान कंपन्यांना अधिक वेगाने होतो. व्यवसायासाठी अनुकूल परिस्थिती असते, तेव्हा या विभागांमध्ये जोखीम किंवा चढ-उतार जास्त असले तरी भांडवल वाढीची उच्च क्षमता असते. थोडक्यात सांगायचे तर, बदलत्या बाजारपेठेत दृढ पोर्टफोलिओ ही एक अडचण ठरू शकते. फ्लेक्सीकॅप फंड इक्विटी गुंतवणुकीसाठी अधिक अनुकूल आणि व्यावहारिक मार्ग देतात. या धोरणाशी सुसंगत फंड शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी आयसीआयसीआय प्रुडेन्शियल फ्लेक्सीकॅप फंड हे एक उत्तम उदाहरण आहे. मार्केट-कॅप्समधील त्याचे लवचिक वाटप विविध मार्केट सायकल्समधील संधींचा लाभ घेताना वैविध्य राखण्याचे उद्दिष्ट ठेवते. ३० एप्रिल २०२६ पर्यंत या फंडाने एका वर्षात ७.८५ टक्के, तीन वर्षांत १७.४९ टक्के आणि सुरुवातीपासून (जुलै २०२१) १४.१२ टक्के सीएजीआर दराने परतावा दिला आहे.

# SWAYAM-NPTEL परीक्षेत आयएमएसच्या विद्यार्थ्यांचे यश

नगर – अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी SWAYAM-NPTEL ऑनलाईन अभ्यासक्रम आणि परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

संस्थेसाठी अत्यंत अभिमानाची बाब म्हणजे, प्रा. डॉ. हर्षवर्धन भावसार यांना IMSCDR, अहिल्यानगर NPTEL Local Chapter च्या वतीने उत्कृष्ट कार्य, विद्यार्थी सहभाग आणि परिणामकारक समन्वयासाठी Active SPOC Award प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान जुलै–डिसेंबर २०२५ या सत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल देण्यात आला.

यासोबतच आणखी एक मानाचा टप्पा गाठत संस्थेला जानेवारी–एप्रिल २०२६ सत्रासाठी Active NPTEL Local Chapter म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे आणि सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण निकालांमुळे हा बहुमान संस्थेला मिळाला आहे.

या कालावधीत IMSCDR च्या विद्यार्थ्यांनी SWAYAM-NPTEL या राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन शिक्षण मंचावर उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे १२ विद्यार्थ्यांनी सिल्व्हर मेडल प्राप्त केले, तर ४१ विद्यार्थ्यांनी एलिट सर्टिफिकेशन मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. तसेच विद्यार्थ्यांनी एकूण ९४ अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित केली. या यशाबद्दल संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस तसेच प्रा. डॉ. एच. एन. भावसार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नियुक्तीचे अहिल्यानगरमधील नागरिकांचे स्वागत

## पूर्वीच्या निष्क्रिय अधिकाऱ्यांचा चव्हाट्यावर निषेध; सुप्रभात मॉर्निंग ग्रुपचा पुढाकार

नगर – अन्न व औषध प्रशासन आयुक्त पदाचा पदभार स्वीकारताच अवघ्या तीन दिवसांत भेसळखोरांवर सर्जिकल स्ट्राईक करणारे धडाडीचे अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या पाठीशी आता नागरिक उभे राहत आहे. अहिल्यानगरमध्ये सुप्रभात मॉर्निंग ग्रुपचे सर्व सदस्य आणि जागरूक नागरिकांनी एकत्र येत जॉगिंग ट्रॅकवर अनोखे आंदोलन केले. या आंदोलनात तुकाराम मुंढे यांचा 'अभिनंदन फलक' लावून त्यांनी अन्न भेसळ विरोधात सुरु केलेल्या कारवाईचे स्वागत करण्यात आले आहे. तर पूर्वीच्या निष्क्रिय अधिकाऱ्यांचा चव्हाट्यावर 'निषेध करणारा फलक' लावून नागरिकांनी आपला तीव्र संताप व्यक्त केला.

तुकाराम मुंढे यांनी पदभार घेताच अवघ्या तीन दिवसांत ५३ धाडी टाकून ३३ भेसळखोरांना गजाआड केले, तसेच कोट्यवधी रुपयांचा बनावट व भेसळयुक्त मुद्देमाल जप्त केला. जर तीन दिवसांत एवढी मोठी कारवाई होऊ शकते, तर यापूर्वीचे अधिकारी वर्षानुवर्षे काय करत होते? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. या संदर्भातील एक सविस्तर मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना देण्यात आले.

जनतेच्या आणि लहान मुलांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या FDA विभागात तुकाराम मुंढे यांच्यासारख्या प्रामाणिक अधिकाऱ्याची नियुक्ती केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर आभार मानण्यात आले. पूर्वीच्या निष्क्रिय अधिकाऱ्यांची चौकशी करा, मुंढे यांच्या आधी या पदावर असलेल्या ज्या अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली आणि ज्यांच्यामुळे भेसळखोरांचे रॅकेट फोफावले, अशा तत्कालीन अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.





सुप्रभात मॉर्निंग ग्रुपचे सदस्य व जागरूक नागरिकांनी एकत्र येत सावेडी जॉगिंग ट्रॅकवर अनोखे आंदोलन केले. आंदोलनात तुकाराम मुंढे यांचा 'अभिनंदन फलक' लावून त्यांनी अन्न भेसळ विरोधात सुरु केलेल्या कारवाईचे स्वागत करण्यात आले आहे. दुसऱ्या छायाचित्रात या संदर्भातील सविस्तर मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना देण्यात आले.

### मुंढे यांच्या बदलीची 'फिल्डिंग' रोखा

प्रामाणिक अधिकाऱ्याची बदली करण्यासाठी भ्रष्ट लॉबी आणि हितसंबंधी सक्रिय होण्याची शक्यता असते. शासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता मुंढे याच पदावर पूर्ण संरक्षण द्यावे, अशी मागणी नागरिकांनी लावून धरली आहे. लहान मुलांच्या दुधापासून ते आजारपणातील औषधांपर्यंत सर्वच गोष्टींमध्ये भेसळ करणाऱ्या नराधमांना पोसणाऱ्या व्यवस्थेचा यावेळी तीव्र निषेध करण्यात आला.

यामध्ये सुप्रभात मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, महिला भगिनी आणि तरुणांचा प्रचंड सहभाग होता. लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने महिलांचा सहभाग अत्यंत लक्षणीय होता. मुंढे साहेबांचे अभिनंदन झालेच पाहिजे आणि आधीच्या कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे, अशी एकच भावना सर्वांच्या मुखातून व्यक्त होत होती.

या आंदोलनातून अहिल्यानगरमध्ये सध्या प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या समर्थनार्थ आणि भ्रष्ट व्यवस्थेच्या विरोधात एल्गार पुकारण्यात आला.

यावेळी सुप्रभात ग्रुपचे सदस्य शिवाजीराव साळवे, पत्रकार विठ्ठल लांडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब सोनवणे, विजय कुलाळ, साहेबराव आनंदकर, शैलेश राजगुरू, सुभाष मिसाळ, सूर्यकांत दगडे, भास्कर मिसाळ, बाळकृष्ण आव्हाड, वसंत सिंग, सुनील राऊत, रमेश पळसे, सुनील कुलकर्णी, बाळासाहेब कुलकर्णी, राजेंद्र दासरी, विजय पाटोळे, जालिंदर तनपुरे स्वानंदी महिला ग्रुपच्या सर्व सदस्या सौ. सोनल जोशी, आशा विधाते, संध्या वारे, वर्षा गुरनानी आदी उपस्थित होते.

# न्यू आर्ट्स महाविद्यालयात बी.एस्सी. डेटा सायन्स आणि कॉम्प्युटर सायन्स प्रवेशासाठी १८ जूनला प्रवेश परीक्षा

नगर – न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजच्या बी.एस्सी. डेटा सायन्स, बी.एस्सी. क्लाउड कॉम्प्युटिंग आणि बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२६–२७ च्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी महाविद्यालयाची सामाईक प्रवेश परीक्षा (CET) देणे विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी दिली आहे. ही ऑनलाईन प्रवेश परीक्षा १८ जून रोजी होणार असून, त्यासाठी प्रवेश परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम मुदत १५ जून आहे.



बाळासाहेब सागडे

महाविद्यालयातील अद्ययावत अशा कॅसास (Center For Advanced Studies in Applied Sciences) सेंटरला एक अत्यंत उच्च व समृद्ध शैक्षणिक परंपरा लाभली आहे. देशातील आणि विदेशातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देण्यात येते. या सेंटरमध्ये अनुभवी प्राध्यापक, अद्ययावत इन्फ्रास्ट्रक्चर व अत्याधुनिक प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. या महाविद्यालयातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले अनेक विद्यार्थी आज जागतिक स्तरावर विविध नामांकित आयटी कंपन्यांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. विभागाच्या 'व्हिजन २०३०' या महत्त्वाकांक्षी आराखड्यानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि अॅकॅडमिक एक्सलन्ससाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना उद्योगक्षेत्राच्या गरजांनुसार तयार करण्यासाठी कॉर्पोरेट ट्रेनिंग, टेक्नॉलॉजी ट्रेनिंग, तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन (Expert Lectures), दर्जेदार प्लेसमेंटच्या सुविधा आणि यशस्वी माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावर विभागाने जाणीवपूर्वक भर दिला आहे.

विद्यार्थी आणि पालकांनी प्रवेश प्रक्रियेच्या तारखांची विशेष नोंद घ्यावी. प्रवेश परीक्षा अर्ज भरण्याचा अंतिम १५ जून असून ही ऑनलाईन प्रवेश परीक्षा १८ जून रोजी पार पडणार आहे. तरी तंत्रज्ञान क्षेत्रात आपले करिअर घडवू इच्छिणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या प्रवेश परीक्षेसाठी मुदतीत अर्ज करावेत. प्रवेश प्रक्रियेच्या अधिक माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी कॅसास विभागाचे विभागप्रमुख प्रा. अरुण गांगर्डे यांच्याशी ९४२२२२४४४० यावर संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले आहे.

# महापालिका आरोग्य विभाग व इंडियन मेडिकल असोसिएशन अंतर्गत वुमन डॉक्टर विंगच्यावतीने क्षयरोग रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप

## टीबी मुक्त भारत अभियानाच्या १०० दिवसांच्या विशेष मोहिमेंतर्गत आरोग्य जनजागृती कार्यक्रम उत्साहात

नगर – देशभरात राबविण्यात येत असलेल्या टीबी मुक्त भारत अभियानाला अधिक प्रभावी बनविण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग आणि इंडियन मेडिकल असोसिएशन अंतर्गत वुमन डॉक्टर विंग यांच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोग रुग्णांसाठी पोषण आहार किट वाटप व आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी आणि आरोग्याबाबतची जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास प्रतिसाद मिळाला.




महानगरपालिका आरोग्य विभाग आणि इंडियन मेडिकल असोसिएशन अंतर्गत वुमन डॉक्टर विंग यांच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोग रुग्णांसाठी पोषण आहार किट वाटप व आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर म्हणाले की, केंद्र शासनाच्या टीबी मुक्त भारत अभियानाअंतर्गत १०० दिवसांची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जाऊन क्षयरोगाबाबत जनजागृती केली जात आहे. नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करून संशयित रुग्णांचा शोध घेतला जातो आणि रुग्ण आढळल्यास तातडीने उपचार सुरू केले जातात. योग्य वेळी निदान आणि नियमित औषधोपचार घेतल्यास क्षयरोगाचा रुग्ण सहा महिन्यांच्या कालावधीत पूर्णपणे बरा होऊ शकतो. मात्र यासाठी रुग्णांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे, पौष्टिक आहार घेणे आणि औषधोपचार नियमितपणे सुरू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, सध्या अहिल्यानगर शहरामध्ये ३१८ क्षयरोग रुग्णांवर उपचार सुरू असून त्यांच्यावर सातत्याने वैद्यकीय देखरेख ठेवली जात आहे. विशेष अभिमानाची बाब म्हणजे राज्यातील महानगरपालिका क्षेत्रांमध्ये क्षयरोग नियंत्रण आणि उपचारामध्ये अहिल्यानगरने उल्लेखनीय कामगिरी केली असून रुग्ण बरे होण्याचे प्रमाण तब्बल ९६ टक्के आहे. महाराष्ट्रातील फेब्रुवारी महिन्याच्या रँकिंगमध्ये अहिल्यानगर महानगरपालिका क्षयरोग विभागाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. ही उपलब्धी आरोग्य विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणि नागरिकांच्या सहकार्याचे फलित असल्याचे त्यांनी नमूद केले. वुमन डॉक्टर विंग संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत क्षयरोग रुग्णांसाठी मदतीचा हात पुढे केला असून पोषण आहार किट वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. उपचाराबरोबरच रुग्णांना योग्य पोषण मिळणे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. या माध्यमातून रुग्णांच्या आरोग्य सुधारण्यास मदत होणार असून समाजामध्ये सकारात्मक संदेश जाईल.

अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग आणि इंडियन मेडिकल असोशिएशन अंतर्गत वुमन डॉक्टर विंगच्या वतीने आयोजित कार्यक्रमात पोषण आहार किटचे वाटप मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. ज्योत्स्ना डौले, डॉ. सोनल बोरुडे, डॉ. मेघना पाटणकर, क्षयरोग अधिकारी डॉ. साहिल शेख, योगेश औटी उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. ज्योत्स्ना डौले म्हणाल्या की, समाजामध्ये वैद्यकीय सेवा देताना समाजाप्रती आपले काहीतरी देणे लागते या भावनेतून वुमन डॉक्टर विंगच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. आरोग्य, महिला सक्षमीकरण, जनजागृती आणि सामाजिक उत्तरदायित्व या क्षेत्रांमध्ये संस्था सातत्याने काम करत आहे. त्या पुढे म्हणाल्या की, क्षयरोग हा केवळ वैद्यकीय विषय नसून सामाजिक आणि पोषणाशी संबंधित प्रश्न देखील आहे. त्यामुळे क्षयरोग रुग्णांना पौष्टिक आहार मिळावा या उद्देशाने पोषण आहार किट वाटपाचा निर्णय घेण्यात आला. आज बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे क्षयरोग रुग्णांना किटचे वितरण करण्यात आले. या माध्यमातून रुग्णांचा आत्मविश्वास वाढेल तसेच उपचारांना अधिक चांगला प्रतिसाद मिळेल. महापालिकेच्या माध्यमातून क्षयरोग रुग्णांसाठी उत्कृष्ट आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि आरोग्य विभाग सातत्याने काम करत असून नागरिकांनी वेळेवर तपासणी करून उपचार घेणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाने क्षयरोगमुक्त भारताच्या संकल्पासाठी योगदान देणे आवश्यक आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेचा क्षयरोग विभाग रुग्णांसाठी सातत्याने कार्यरत असून नागरिकांनी उपलब्ध असलेल्या मोफत आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी केले. ते म्हणाले की, खाजगी रुग्णालयांमध्ये उपलब्ध असणाऱ्या अनेक सुविधा, तपासण्या, औषधे आणि उपचार महापालिकेच्या क्षयरोग विभागामध्ये पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत. त्यामुळे क्षयरोगाची लक्षणे जाणवत असल्यास नागरिकांनी तात्काळ तपासणी करून उपचार सुरू करावेत. ते पुढे म्हणाले की, नियमित औषधोपचार, पौष्टिक आहार आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन केल्यास क्षयरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो. रुग्णांनी कोणतीही लाज किंवा भीती न बाळगता महापालिकेच्या आरोग्य सेवांचा लाभ घ्यावा. अधिकाधिक रुग्ण लवकर बरे होऊन समाजात निरोगी जीवन जगावेत आणि टीबी मुक्त भारत घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# वास्तू, निसर्ग आणि तापमान

## बदलत्या ऋतूंमधील समृद्ध वास्तूचा वेध

बऱ्याच वेळा उत्तरमुखी बंगल्यांमध्ये किंवा उत्तर ईशान्य मोकळ्या सोडलेल्या बांधकामांमध्ये किंवा ईशान्य कार्नरच्या प्लॉटबाबत एक गोष्ट निरीक्षणांती लक्षात येते की जर नैसर्गिक तापमान हे ४०–४२ डिग्रीच्यावर गेले तर तिथला ऊर्जा कोश हा काहीअंशी बिघडतो. एकप्रकारे काही कालावधीसाठी अशा वास्तुतले जलतत्व बिघडते आणि त्याचा परिणाम घरातल्या सदस्यांच्या मानसिकतेवर पर्यायाने शाब्दिक आणि अल्पप्रमाणात आर्थिक नियोजन चुकण्यात होऊ शकतो. हा कालावधी अल्प जरी असला तरी तात्पुरती का होईना चालू कामाची घडी तो बिघडवतो. हि बिघडलेली घडी लवकर परत घालता येणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या बांधकामांमधे व्यक्ती–वास्तू आणि सभोवताल यांचा मिलाफ करता येणे आवश्यक आहे. नुसता उत्तर मुखी प्लॉट किंवा ईशान्य कॉर्नरचा प्लॉट एवढाच सरधोपट विचार करणं हे पूर्णपणे चुकीचं किंवा वेडेपणा ठरतो.

वास्तु आणि भावनातला प्रवेश हा योग्य प्रभागातून मेळ घालून घेतला तर सहाजिकच इतर सर्व गोष्टी सहज सुलभ होतात. एकप्रकारे प्रदक्षिणा मार्गाचा चिरंतन आशिर्वाद अशा वास्तुंवर असतो. म्हणूनच वास्तु आणि भवन यांचा अर्थपूर्ण 'अर्थ' हा वास्तुतज्ञ आला माहिती असलाच पाहिजे.

सूर्याचे दक्षिणायन आणि उत्तरायण, वास्तुची दिशा, भवनाचा प्रभाग, वास्तूत राहणार्या व्यक्तींची नाडी म्हणजे त्यांचा प्रकृती पिंड यांचे वास्तु रचनेशी नाते जोडता येणे हे कोणतीही वास्तु रचना करताना अत्यावश्यक आहे.

प्लॉटचे तरंग, समतलता–उतार आदी बाबींचा विचार यासाठी आवश्यक ठरतो. त्याचप्रमाणे आपल्या वास्तूचे सभोवताली भरपूर विविधतापूर्ण लहानमोठ्या झाडांची रचना करणे आदी बाबींचा उपयोग हा भवनाचे बाह्य तपमान मर्यादित राहायला मोठा उपयोगी होतो.

अशा वास्तूत भवनाचे जोते, भिंतीची जाडी, भिंतीची योग्य उंची, भवनात हवा खेळती रहाण्यासाठी योग्य प्रभागातून केलेले खिडक्यांचे योग्य आकाराचे नियोजन, तपमानाशी मेळ घालणारे नैसर्गिक प्रकारचे फ्लोअरींग (मार्बल इ.) वार्याचा झोत आणि प्रकाशाची दिशा– घरातल्या सदस्यांची संख्या, यांचे वयोपरत्वे कार्यक्षेत्र आणि कौटुंबिक गरजा यांची योग्य रुजवात आपल्याला आपल्या वास्तुत घालता आली पाहिजे. तर त्या वास्तुरचनेचा उपयोग होवू शकतो. अशा प्रकाराच्या रचनांमधे वाढत्या तपमानावरही काही प्रमाणात मात करुन आपल्याला कायमस्वरूपी चंद्राची शितलता, सुबत्ता आणि ऐश्वर्य अनुभवायला येते. वास्तुला एकप्रकारचा सुर–ताल–लय प्राप्त झाला की सुसंवादातून तयार होणारा नाद हा चिरंतन प्रगती देतो.

आपल्या परिसरात आणि आपल्या वास्तुभोवती तपमान सहन होईल इतके ठेवण्यासाठी वृक्ष लागवड करणे पण अतिशय गरजेचे आहे. दुर्दैवाने होते काय की परिसरात माझा काय संबंध म्हणून आपण आपल्या परिसरात पुढाकार न घेता काना डोळा करतो तर आपल्या वास्तूच्या भोवती झाडांच्या वाळलेल्या पानांचा कचरा नको म्हणून तिकडेही दुर्लक्ष करतो. एकूणच काय आपण आपल्या काही विचित्र समजूतींमुळे आपलंच नुकसान करून घेतो.

वास्तुशास्त्र हे एक मनुष्याचे जीवन अनुकूल करून घेण्याचे एक कलात्मक उपाय शास्त्र आहे. त्यामुळे फक्त वास्तू रचना एवढाच विषय हा छोटा नसून खरंतर आपल्या परिसराशी जास्त निगडित आहे.

**– कौस्तुभ काळे, वास्तु वाचस्पति, अहिल्यानगर, ९८५०९४१८८१**

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# १० वी नंतर पारंपारीक शिक्षणापेक्षा नवीन पर्याय - एम.सी.व्ही.सी.

## (व्होकेशनल सायन्स) टेक्निकल / अर्ध वैद्यकिय अभ्यासक्रम - ११ वी व १२ वी

नगर - १० वी मध्ये कमी गुण मिळाले किंवा ए.टी.के.टी. मिळाले तर प्रत्येक पालकांना व विद्यार्थ्यांना प्रश्न पडतो की आता १० वी नंतर पुढे काय ? कोणती शाखा निवडायची हा प्रश्न रात्रंदिवस सतत भेडसावत असतो. केंद्रशासनाने संपूर्ण भारतात व्यावसायिक अभ्यासक्रमाची निवड केली. जे आपण ११ वी प्रवेश बरोबर करु शकता. अशा अभ्यासक्रमाची गरज संपुर्ण जगाला वाटु लागली आहे. हे अनेक पालक व विद्यार्थ्यांना माहिती नाही. नगर शहरातील प्रसिध्द जीवन ज्योत मेडिकल फॉउंडेशन बॉम्बे हॉस्पीटल बिल्डींग, वनविभाग मागे, नगर औरंगाबाद रोड, अहमदनगर, ही संस्था शासन मान्यता प्राप्त असुन २६ वर्षापासुन कार्यरत आहे. पारंपारीक शिक्षणापेक्षा नविन पर्याय विद्यार्थ्यांना देण्यासाठी मागील दहा वर्षापासुन जीवन ज्योत महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमाची स्थापना करण्यात आली आहे. या विद्यालयामध्ये तीन विविध व्यावसायिक टेक्निकल/अर्धवैदयकिय अभ्यासक्रम सुरु झाले आहे. १) कॉम्प्युटर टेक्निक्स् २) मेडिकल लॅब टेक्निशियन ३) रेडीओलॉजी टेक्निशियन, हे अभ्यासक्रम १० वी पास/ ए.टी.के.टी. विद्यार्थी / विदयार्थीनींना मराठी किंवा इंग्रजीच्या माध्यमाव्दारे अल्प मुदतीत अल्प खर्चात पुर्ण करता येतो. तसेच हे अभ्यासक्रम पुर्ण करुन १२ वी बोर्डाची परिक्षा देता येते. हे अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यावर १२ वी ची पात्रता व व्यावसायीक प्रमाणपत्र आणि रोजगार स्वयंरोजगार करणे, तसेच शासकिय निमशासकिय किंवा खाजगी नोकरीची पात्रता व संधी व उच्च शिक्षणासाठी पात्र १) एफ. वाय.बी.ए, एफ. वाय. बी. कॉम, किंवा एफ. वाय. बी.एस्सी विदयाशाखेला प्रवेश घेता येतो. २) उत्तीर्ण विदयार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित व्यवसाय शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी मिळते. ३) सुशिक्षित बेराजगारांसाठी बीजभांडवल सहाय्य योजना अंतर्गत उत्तीर्ण उमेदवारांना सुलभ अर्थसहाय्य मिळु शकतो. ४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठाने या अभ्यासक्रमांना संलग्न असे पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याचे ठरविले आहे. सध्या इलेक्ट्रॉनिक्स व हार्टीकल्चर हया पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रवेश दिला जातो. ५) हे अभ्यासक्रम उत्तीर्ण विदयार्थ्यांना पदविका अभ्यासक्रमात व्दितीय वर्षात प्रवेशासाठी जागा राखीव. ६) प्रशिक्षण कालावधीत कारखान्यात/उदयोगांच्या ठिकाणी प्रत्यक्ष कामाच्या जागी प्रशिक्षणाची सोय. ७) महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक दि. ३१ जुलै २००९ अन्वये १२वी (व्होकेशनल) उत्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यांना डी.एड कोर्स न करता शिक्षक म्हणुन नोकरीची सुवर्ण संधी आहे. ८) मागासवर्गीय, अनुसुचित जाती-जमाती, व अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे शिष्यवृत्ती. ९) रोजगारसाठी मार्गदर्शन व सहाय्य. १०) एज्युकेशन लोनची सुविधांचे मार्गदर्शन.

जर आपणास व्यवसाय कराण्याचा असल्यास व्यवसाय करता येतो. जर आपणास शिकाऊ उमेदवारी (ॲप्रेंटिसशिप) करायची असल्यास नामांकीत कंपनी / हॉस्पीटल / लॅबोरेटरीमध्ये करुन नोकरी मिळविता येते. शिवाय स्वयंरोजगार करण्याचीही संधी आहेच. म्हणजे या अभ्यासक्रमाच्या माध्यमातुन आपणास बारावी नंतर योग्य दिशा मिळण्यास मदतच होणार आहे.

अर्ध वैदयकिय अभ्यासक्रम पुर्ण केल्यावर महाराष्ट्र शासनाचे, पॅरामेडिकल कौन्सिलमध्ये रजिस्ट्रेशन करता येते. संपुर्ण महाराष्ट्रात अनेक शासकिय रुग्णालयामध्ये मेडिकल लॅब टेक्निशियन / रेडीओलॉजी टेक्निनिशियन हा अभ्यासक्रम उत्तीर्ण विदयार्थ्यांना लॅब टेक्निशियन / रेडीओलॉजी टेक्निशियन पदासाठी (पे स्केल रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रु. ५६००) भरती प्रक्रिया झाली आहे. थोडक्यात एक चांगला अभ्यासक्रम पुर्ण करण्याची संधी मिळविता येते. तसेच यासाठी वयाची अट नाही. अगदी शासनमान्य अभ्यासक्रमामध्ये हे अभ्यासक्रम उपयुक्त व फायदयाचे आहे. या कोर्समुळे दोन वर्षामध्ये १२ वी सायन्स व स्वतःचे उत्पन्नाचे साधन मिळून बेरोजगारी वर मात करुन आपले भविष्य उज्वल करु शकता व स्वतः ची आर्थिक स्थिती सुधारु शकतात. यामुळे तुमचे राहणीमान उंचावते.. तसेच सामाजिक प्रतिष्ठा उंचावून तुम्ही स्वाभिमानाने आजच्या जगात वावरु शकता. सध्याच्या काळात अर्धवैद्यकिय व व्यावसायिक शिक्षण हे अपकमिंग क्षेत्र आहे. मागील पाच सहा वर्षात अर्धवैदयकिय व व्यवसायीक क्षेत्राने इतर सर्वच क्षेत्रांना मागे टाकत शिक्षण क्षेत्रात आपली क्रांती केली आहे. इतर कोणत्याही क्षेत्रात शिक्षण घेऊन मोठ्या प्रमाणात खर्च करुन, वेळ घालुन पुढे नोकरीची संधी कुठेच राहीली नाही. परंतु पॅरमेडिकल व व्यवसायीक हे असे क्षेत्र आहे. ज्या ठिकाणी आज शिक्षणासाठी खर्च कमी असून मनुष्यबळाची गरज जास्त आहे. परंतु त्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. या क्षेत्रातील रोजगार कोणत्याही क्षेत्रापेक्षा १० पटीने अधिक आहे, त्यामुळे आता विद्यार्थ्यांनी व पालकांनी वेळीच सावध होऊन व आपल्या उज्वल भविष्याचा विचार करुन आजच या क्षेत्राची माहिती घेणे गरजेचे आहे. पदासाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी. या पेक्षाही अधिक माहीती साठी व प्रवेशासाठी संपर्क करावा किंवा समक्ष भेटा. प्राचार्य, जिवन ज्योत ज्युनिअर कॉलेज, बॉम्बे हॉस्पीटल बिल्डींग, वनविभाग मागे, नगर-औरंगाबाद रोड, अहमदनगर. मो. ८८३०६८५७३२. On line admission साठी www.jjmf.info वर भेट द्या.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वन्ही तो चेतवावा रे!



संकलन: दिशान फिचर्स

तुम्ही कितीही धडपडा. लागल्यास पायाही पडा; पण तुमचे कुणी नाही मानणार! कारण माणसाच्या विश्वासालाच गेलाय तडा! तो म्हणतो विश्वासाचे नावच काढू नका. सगळीकडेच भ्रष्टाचार. अनैतिकतेचा प्रचार. नावाला तरी उरलाय का सदाचार? सर्वत्र स्वार्थाचा बाजार! प्रत्येकाला हवी सत्ता, संपत्ती व स्वैराचार! कुणी नाही आवरत हा दुराचार. चालू देतात हे सगळे प्रकार. मग विश्वास ठेवायचा कसा? कुठे? व कुणावर ? 'नैषधीयचरित' नावाचे विख्यात संस्कृत महाकाव्य लिहिणारा श्रीहर्ष नावाचा महाकवी हेच सांगतो.

कुणी तरी वाट काढायचीच वाट पाहत असतात बाकीचे. मग त्याच्या मागोमाग येणारे हजारो मिळायचे! लोकांत असते कर्तृत्व; पण त्यांना हवे असते नेतृत्व.

माणसाची बुद्धी सत्कर्मे तत्काळ पारखणारी व अचूक निरखणारी असावी. मानवजातीचे कल्याण करणारी कोणती दुसरी कल्पना यासारखी? न व्हावे हताश. तोडावेत निराशेचे पाश. भ्रष्टाचारी व्हावेत खलास ! जागे करावे जनांस. जिथे धडाडी, तिथे समृद्धीची आघाडी! हीच सुवर्णघडी! घे भ्रष्टाचारविरोधी लढ्यात उडी! धन्य होईल तुझी कुडी !

अराजक माजले, की लोकांचे हाल झाले. हा इतिहासच आहे.

माणसांची बुद्धी चळते. क्षणोक्षणी विचित्र वागते. सामान्यजनांना ती बाधते. मग सामान्य माणसाला काही कळेनासे होते. अविश्वासाचे वातावरण निर्माण होते. कोणावर विश्वास ठेवावा ते समजेनासे होते.

पण म्हणून काय हातपाय गाळायचे ? अविश्वासाच्या वातावरणात गुदमरायचे? अत्याचाराचे वार सोसायचे ? भ्रष्टाचारापायी संपूर्ण नष्ट व्हायचे

हताश व्हायचे काय कारण? धरा हिम्मत. दाखवा साहसाची करामत. अन्यायाविरुद्ध लढायला व्हा तयार. करा सुरू लढाई. विजयश्री लोळेल तुमच्या पायी. ऐका तर ही वेदकालीन कथा.

ऋग्वेदकाली होता एक राजा. नाव त्याचं वेन. अत्यंत जुलमी, अन्यायी, अत्याचारी. त्याचे सगळे अधिकारी भ्रष्टाचारी. प्रजा जायची भरडली. सगळ्यांची मती गुंग झाली. सर्वत्र अविश्वास, संशय आणि घृणा पसरलेली. शेतीची कामे तुंबलेली. पिके ना काही. गरिबांची तर उपासमारच होई; पण सगळे हताश. काय करायचे? राजाविरुद्ध कसे उठायचे? कुणी पुढे व्हायचे ?

शेवटी वेन राजाचा पुत्रच झाला तयार. त्यानेच उपसले जुलमाविरुद्ध हत्यार. झाले लाखो प्रजाजन त्याच्या पाठीशी उभे राहायला तयार नव्हती शस्त्रे. उचलले त्यांनी दगडगोटे. गेले कित्येक प्राण. पण वेन झाला दगडांच्या माऱ्याने हैराण आणि शेवटी सोडला त्याने प्राण. जनतेचा झाला विजय. वेन राजाच पुत्र पृथू! त्याने काढला निपटून भ्रष्टाचार. थांबवले अत्याचार. जनतेत निर्माण झाला विश्वास. प्रत्येकाने टाकला सुटकेचा निःश्वास. आता जमीन पिकली. जमिनीला, पृथूची म्हणून पृथ्वी ह्या नावाने प्रसिद्धी लाभली.

**- किशोर गांधी**



## राष्ट्रवादी कॉँग्रेसतर्फे (अजित पवार) फळांचे वाटप

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त अजित पवार गटाच्या वतीने अहिल्यानगरमधील सिव्हिल हॉस्पिटल आणि कुष्ठधाम येथील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक प्रकाश भागानगरे, बाळासाहेब पवार, मयूर बांगरे, महेश तवले, वैभव ढाकणे, नितीन घोडके, दीपक खेडकर, सुरज कोतकर, सुरज शिंदे, गणेश बारस्कर आदी उपस्थित होते. (छाया - लहू दळवी)

# राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार) पक्षाचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात

### अहिल्यानगर येथील पक्ष कार्यालयात ध्वजारोहण; पक्ष बळकटीकरणासाठी एकजुटीचे दादाभाऊ कळमकर यांचे आवाहन



नगर - राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी (शरद पवार) पक्षाचा २७ वा वर्धापन दिन अहिल्यानगर येथील राष्ट्रवादी भवन येथे साजरा करण्यात आला. यानिमित्त पक्ष कार्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, ख्रिश्चन सेलचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे, अशोक बाबर, विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान, महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड, फारूक रंगरेज, सतीश क्षेत्रे, मतीन शेख, शरद शिंदे, समीर पठाण, गणेश तोडमल, परवेज शेख, विजय सात्रलकर आदी उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर म्हणाले की, पक्ष स्थापनेपासूनची वाटचाल ही अभिमानास्पद राहिली असून समाजातील सर्व स्तरांतील शेवटच्या घटकापर्यंत पक्षाने आपले नाते दृढ केले आहे. आगामी काळातही हे नाते अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्यरत राहणे आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, विकासाची दृष्टी समोर ठेवून राज्य व देशाला प्रगतीपथावर नेण्याचे ऐतिहासिक कार्य पक्षाचे संस्थापक खासदार शरद पवार यांनी केले आहे. सामान्य माणसांचे प्रश्न जाणून घेत उपेक्षित घटकांपर्यंत आर्थिक व सामाजिक परिवर्तन पोहोचविण्याचे ध्येय हेच पक्षाच्या कार्याचे वैशिष्ट्य राहिले आहे. पक्षाच्या २७ व्या वर्षात पदार्पणाच्या निमित्ताने पुरोगामी विचारांचा वारसा अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षाचे ध्येय-धोरण जनतेपर्यंत पोहोचवून पक्ष मजबुतीकरणासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.

# पत्रकार भूषण देशमुख यांचे उचित स्मारक व्हावे

## पत्रकार व सीएसआरडीतर्फे श्रद्धांजली सभा

नगर - पत्रकार व इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांनी अहिल्यानगर शहराचा इतिहास जतन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी त्यांचे शहरात उचित स्मारक व्हावे, अशा भावना पाहुण्यांनी श्रद्धांजली सभेत व्यक्त केल्या.



शहरातील पत्रकार व सीएसआरडी यांच्या वतीने दिवंगत ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'सीएसआरडी' महाविद्यालयात आयोजित श्रद्धांजली सभेमध्ये बोलताना माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे. व्यासपीठावर उपस्थित असलेले जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा, पोपटराव पवार आदी.

शहरातील पत्रकार व सीएसआरडी यांच्या वतीने दिवंगत भूषण देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'सीएसआरडी' महाविद्यालयात श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. ज्येष्ठ पत्रकार महादेव कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. महापौर ज्योती गाडे, माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे, माजी आमदार लहू कानडे, पोपटराव पवार, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा यांची सभेला प्रमुख उपस्थिती होती. देशमुख यांचे कुटुंबियही यावेळी उपस्थित होते.

सभेत बोलताना निमसे म्हणाले, शहराच्या ऐतिहासिक वास्तूंची ख्याती सर्वदूर पोहोचविण्यासाठी देशमुख सतत प्रयत्नशील होते. आचार्य नरेंद्र देव यांनी येथील भुईकोट किल्ल्यात स्वातंत्र्यानंतर पहिले ध्वजारोहण केले. देव यांची बुद्धीझमवर लिहिलेले पुस्तक हे या किल्ल्यात असावे यासाठी देशमुख यांनी मोठे प्रयत्न करुन ते पुस्तक मिळविले. याचे आपण साक्षीदार आहोत.

पवार म्हणाले, देशमुख यांचे शहरात उचित स्मारक होणे आवश्यक आहे. कारण त्यांनी इतिहास जपण्यासाठी खूप धडपड केली. महापालिकेच्या जुन्या कॉन्सिल हॉलचे पुनरुज्जीवन करण्याचे त्यांचे स्वप्न होते ते पूर्ण व्हायला हवे.

पठारे म्हणाले, भूषण यांनी पत्रकारिता, इतिहास, पत्रकारितेचे प्रशिक्षण अशा विविध क्षेत्रात योगदान दिले. शिल्पकार प्रमोद कांबळे, जयंत येलूलकर यांनीही देशमुख यांच्या अनेक आठवणींना उजाळा देत त्यांच्या स्मृती जतन करण्याची गरज प्रतिपादीत केली.

यावेळी अरविंद पारगावकर, पवन नाईक, रामदास ढमाले, सुभाष वारे, शिल्पा रसाळ, डॉ. सुधा कांकरिया, प्रकाश पाटील, अनिरुद्ध देवचक्के, राजू इनामदार, आबासाहेब गाडे, अमृत मुथा, सतीश गुगळे, सीए अभयकुमार कटारिया, कुलकर्णी ज्ञानेश, सीए राजेंद्र काळे, अजय धोपावकर, सय्यद मरियम यांनी भावना व्यक्त केल्या.

सभेला सतीश कुलकर्णी, सुधीर लंके, विठ्ठल लांडगे, श्रीराम जोशी, सतीश डेरेकर, नितीन पोटलाशेरु, लैलेश बारगजे, संध्या मेढे, शाम असावा, शिवाजी नाईकवाडी, मकरंद घोडके, रवींद्र सातपुते, बाबा जाधव, अर्शद शेख, मन्सूर शेख, सुरेखा आडम, शिवाजी साळवे, सचिन चोभे, अन्सार सय्यद, उबेद शेख, वीणा दिघे, अशोक निंबाळकर, सरोज आल्हाट, शिवाजी पालवे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन सुदाम देशमुख यांनी केले. विजयसिंह होलम यांनी आभार मानले.

### कौन्सिल हॉलच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव

महापालिकेचा जुना कौन्सिल हॉल आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्यांपासून देशमुख खूप व्यथित होते. या हॉलचे नव्याने सुशोभिकरण करण्याचे त्यांचे स्वप्न होते. हा हॉल देशमुख यांच्या नावाने सुशोभित करता येऊ शकतो. त्यासाठी त्यांचा परिवार दहा लाख रुपये देणगी देईल, असे स्नेहालयचे डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी सांगितले. माजी आ. लहू कानडे यांनीही या उपक्रमासाठी एक लाख रुपये देण्याची घोषणा केली.

### अहिल्यानगरचा इतिहास बांग्लादेशपर्यंत

स्नेहालयच्यावतीने भारत-बांगलादेश यात्रा काढण्यात आली. त्यावेळी देशमुख यांनी बांगलादेशात तेथील मंत्र्यांना देखील अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यांचा व मराठ्यांचा इतिहास सांगितला, ही आठवण गिरीश कुलकर्णी यांनी सांगितली.



## मानद डॉक्टरेट मिळाल्याबद्दल डॉ.सुनिल सकट यांचा सत्कार

दिल्ली येथील मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशनच्यावतीने नुकतीच त्यांना सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ.सुनील सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल उपमहापौर धनंजय जाधव यांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी अमोल गाडे, नगरसेवक सुजय मोहिते, पै.महेश लोंढे, जितेंद्र गंभीर, नामदेवराव चांदणे, डॉ.बाबासाहेब शिंदे, अशोक भोसले, संतोष सिरसाट, शिवराम आर्या, लखन साळवे आदी उपस्थित होते. (छाया - लहू दळवी)

# योग विद्या धामच्या वतीने २० जून रोजी महिलांसाठी योगासन स्पर्धेचे आयोजन

नगर - जागतिक योग दिनानिमित्त येथील योग विद्या धामच्या वतीने २० जून रोजी महिलांसाठी योगासन स्पर्धा आयोजित केली आहे, अशी माहिती योग विद्याधामचे अध्यक्ष डॉक्टर सुंदर गोरे यांनी दिली.

ही स्पर्धा सकाळी ६ ते १० या वेळेत कोहिनूर मॉल येथे होणार आहे. ही स्पर्धा २० ते ३५ वर्ष पहिला गट व ३५ वर्षापेक्षा जास्त असणाऱ्या महिलांसाठी दुसरा गट अशा दोन गटात होणार आहे. या स्पर्धेत विजयी होणाऱ्या महिलांना प्रथम, द्वितीय व तृतीय आणि तीन उत्तेजनार्थ बक्षीसे दिली जाणार आहेत. तसेच स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्पर्धकास सन्मानपूर्वक आकर्षक बक्षीस दिले जाणार आहे.

महिलांच्या सुप्त गुणांना व चांगल्या आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महिलांना दोन आसने करावी लागणार आहेत. पहिले आसन त्यांनी स्वतःच्या पसंतीने करावयाचे आहे. तर दुसरे आसन परीक्षक ऐनवेळी करावयास सांगणार आहेत. या स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी ९४२३९६२९४० किंवा ९३२६९४०१३६ या नंबरवर संपर्क साधावा. तसेच या स्पर्धेमध्ये महिलांनी सहभागी व्हावे असे आवाहन योग विद्या धामच्या प्रकल्प प्रमुख पूजा गांधी यांनी केले आहे.



## अवनीश गोरे याला सायन्स ओलंपियाडमध्ये गोल्ड मेडल

इंटरनॅशनल सायन्स ओलंपियाड स्पर्धा परीक्षेमध्ये अवनीश सुदर्शन गोरे याला गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले. इंटरनॅशनल सायन्स ऑलिम्पियाडतर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेमध्ये अवनीश गोरे याचा देशात १०५ वा नंबर आला. सायन्स ओलंपियाडमधील या यशाबद्दल त्याचे प्रिन्सिपल डॉ. मंगेश जगताप व वर्गशिक्षिका गांधी मॅडम यांनी अभिनंदन करून कौतुक केले.

# धर्मादाय संस्थांकडील दुर्मिळ हस्तलिखिते, अभिलेख व दस्तऐवजांची 'ज्ञानभारतम ॲप'वर नोंदणी करावी

## १५ जूनपर्यंत माहिती नोंदविण्याचे आवाहन

नगर - जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक विश्वस्त संस्था, मंदिरे, मठ, आश्रम, धार्मिक व शैक्षणिक संस्था तसेच प्रतिष्ठानांनी जतन केलेल्या दुर्मिळ हस्तलिखिते, पोथ्या, धार्मिक ग्रंथ, अभिलेख तसेच आयुर्वेद, गणित, विज्ञान, खगोलशास्त्र, इतिहास, समाजसुधारणा, गड-किल्ले, लोकपरंपरा आदी विषयांवरील दुर्मिळ हस्तलिखिते व दस्तऐवजांची माहिती केंद्र शासनाच्या 'ज्ञानभारतम' ॲपवर १५ जूनपर्यंत नोंदवावी, असे आवाहन धर्मादाय उपायुक्त, अहिल्यानगर यांनी केले आहे.

धर्मादाय संस्थांकडे अनेक वर्षांपासून जतन करण्यात आलेली ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वाची हस्तलिखिते उपलब्ध आहेत. या अमूल्य ज्ञानसंपदेचे जतन, संवर्धन व डिजिटल दस्तऐवजीकरण करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने 'ज्ञानभारतम' उपक्रम सुरू केला आहे.

या ॲपवर नोंदणी करताना हस्तलिखिताचे शीर्षक, भाषा, लिपी, विषय, जतनाची स्थिती, मालकी हक्कासंबंधी माहिती तसेच संबंधित हस्तलिखितातील काही पानांची छायाचित्रे अपलोड करता येतील. नोंदणी करताना लोकक्षोभ निर्माण करणारी, भडकावू स्वरूपाची अथवा अश्लील आशयाची हस्तलिखिते नोंदवू नयेत. नोंदविण्यात येणाऱ्या माहितीची सत्यता तपासूनच नोंदणी करावी. केंद्र शासनाकडून या हस्तलिखितांचे केवळ डिजिटलीकरण व दस्तऐवजीकरण करण्यात येणार असून संबंधित हस्तलिखितांवरील मालकी हक्क अबाधित राहणार आहेत. कोणतेही मालकी हस्तांतरण करण्यात येणार नाही.

जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक विश्वस्त संस्था, मठ, मंदिरे, धार्मिक प्रतिष्ठाने, शैक्षणिक संस्था व ग्रंथालयांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेचे जतन, संवर्धन व दस्तऐवजीकरण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.



पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगरमध्ये 'ग्रीन सिटी प्रकल्प' राबवीला जात आहे. त्याच अनुषंगाने नगर महाविद्यालयाच्या मागील हाजी हसनशहा बागबान कब्रस्तान मध्ये पर्यावरणप्रेमी शेख गुलाम हुसेन यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आल्याची माहिती रफिक मुन्शी यांनी दिली.

# महापालिकेकडून कोठला स्टॅण्ड-फलटण पोलीस चौकी ते मंगल गेट रस्ता काँक्रीटीकरणाचे काम विक्रमी वेगाने पूर्ण

नगर – शहराच्या वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणारे आणि मध्यवर्ती भागाच्या विकासाला चालना देणारे कोठला स्टॅन्ड, फलटण पोलीस चौकी ते मंगल गेट दरम्यानच्या रस्ता काँक्रीटीकरणाचे काम महानगरपालिकेच्या माध्यमातून जलद गतीने पूर्ण करण्यात आले आहे. निविदेनुसार सुरु करण्यात आलेले हे काम अवघ्या १५ ते २० दिवसांच्या कालावधीत दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाले.


महापालिकेकडून कोठला स्टॅण्ड-फलटण पोलीस चौकी ते मंगल गेट रस्ता काँक्रीटीकरणाचे काम विक्रमी वेगाने पूर्ण झाले आहे. (छाया – लहू दळवी)

या रस्त्याच्या काँक्रीटीकरणामुळे परिसराला नव्या सुशोभिकरणाचे रूप प्राप्त झाले असून नागरिकांना आता प्रशस्त, मजबूत आणि सुरक्षित रस्ता उपलब्ध झाला आहे. यापूर्वी या मार्गावर वाहतुकीची कोंडी, धुळीचा त्रास आणि खड्ड्यांमुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र आता रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने वाहतुकीचा वेग वाढणार असून नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. विशेष म्हणजे या रस्त्याचे काम १२ मीटर रुंदीने करण्यात आल्यामुळे परिसरात प्रशस्त रस्ता निर्माण झाला आहे. शहरातील महत्त्वाच्या बाजारपेठा, धार्मिक स्थळे आणि वाहतुकीच्या दृष्टीने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे या मार्गाच्या विकासामुळे हजारो नागरिकांना थेट फायदा होणार आहे.

या रस्त्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आषाढी एकादशी निमित्त निघणाऱ्या पायी दिंडी सोहळ्याचे शहरात आगमन याच मार्गाने होते. दरवर्षी हजारो वारकरी या रस्त्यावरून शहरात प्रवेश करतात. तसेच मोहरम मिरवणुकीची सुरुवातही याच परिसरातून होत असल्याने धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही या रस्त्याला विशेष महत्त्व आहे.

कोठला स्टॅन्ड ते मंगल गेट हा रस्ता शहरातील मंगळवार बाजार, डाळ मंडई, सराफ बाजार, कापड बाजार तसेच सर्जेपुरा परिसराला जोडणारा प्रमुख दळणवळण मार्ग आहे. व्यापारी, ग्राहक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात या रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे या मार्गाचे दर्जेदार काँक्रीटीकरण झाल्याने शहराच्या आर्थिक आणि सामाजिक हालचालींना देखील गती मिळणार आहे.

# 'रयत'च्या उत्तर विभागीय समन्वय समितीवर नगर येथील अंबादास गारुडकर यांची निवड



नगर – शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक क्षेत्रात सातत्याने कार्य करणारे सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय समन्वय समितीच्या सदस्यपदी अंबादास गारुडकर यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या निवडीची घोषणा केली. रयत शिक्षण संस्था ही देशातील सर्वात मोठ्या शैक्षणिक संस्थांपैकी एक मानली जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याचे कार्य संस्थेने गेल्या अनेक दशकांपासून केले आहे.

अंबादास गारुडकर यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच शैक्षणिक संस्थांच्या बळकटीकरणासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. यापूर्वीही गारुडकर यांनी रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य म्हणून महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळली आहे. तसेच अंबिका विद्यालय, केडगाव आणि लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, अहिल्यानगर या संस्थांमध्ये स्कूल कमिटी सदस्य म्हणून त्यांनी प्रभावी योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संस्थांच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत विविध जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपविण्यात आल्या आहेत.

या निवडीबद्दल अंबादास गारुडकर यांनी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार, चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, उत्तर विभागीय अध्यक्ष आमदार रोहित पवार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य अशोक बाबर, ज्ञानदेव पांडुळे तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे विशेष आभार मानले.

## सब ज्युनिअर राज्यस्तरीय बॉक्सिंगसाठी 'ज्ञानसंपदा'च्या आराध्या कातोरेची निवड



नगर – सब जूनियर राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी ६७ ते ७० या वजनी गटात ज्ञानसंपदा शाळेची विद्यार्थिनी आराध्या विश्वनाथ कातोरे हिची निवड झाली. जळगाव येथे ही स्पर्धा होणार आहे. तिला क्रीडाशिक्षक तसेच प्रशिक्षक NS, NIS, कोच मच्छिंद्र साळुंके यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर, शिक्षक वृंद पालक यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मृत्युस कारणीभूत : आरोपी निर्दोष

नगर – ०१/०१/२०१९ रोजी सकाळी ८ वा. चे सुमारास चंदनापुरी शिवारात जावळे वस्ती समोर संगमनेर- पुणे जाणारे रोडवर आपले ताब्यातील टेम्पो क्र. एम.एच. ११-बीएल-७१६० हा संगमनेरकडून ते पुणे रोडने भरधाव वेगात, निष्काळजीपणे चालवून पुढील वाहनास पाठीमागून क्लिनर साईडने जोराची ठोस दिल्याने चालका शेजारील सीटवर बसलेले मंगेश बाळासाहेब रसाळ, रा. सातारा यांच्या डोक्यास व हाता पायास जबर दुखापत होऊन त्यांचे मृत्युस जबाबदार झाले. तसेच स्वतःचे दुखापतीस कारणीभूत झाले म्हणून संगमनेर पोलिसांनी आरोपी रामचंद्र जनार्धन ढेबे, रा. महड, जि. रायगड यांचे विरुध्द भा.दं. वि. कलम ३०४अ, २७९, ३३७,३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४अ, ब, १३५ अन्वये गुन्हा दाखल केला असता, त्याची चौकशी संगमनेर न्यायालयात होऊन त्यात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपीतर्फे बचाव घेण्यात आला की, आरोपी हा वाहतुकीचे सर्व नियमांचे पालन करुन वाहन चालवत होता. फोर लेनमध्ये विरुध्द बाजुने रॉंग साईडने डंपर येऊन त्याने धडक मारुन निघून गेला असा बचाव होता. आरोपीतर्फे ॲड. सतिशचंद्र वि. सुद्रीक यांनी काम पाहिले.

# नागरदेवळेच्या मातीतून उगवली 'दृष्टीदान' क्रांती !

### जालिंदर बोरुडे यांच्या अथक प्रयत्नांतून ११६० अंधांना मिळाली नवदृष्टी; आता गरजूंकरिता 'फिनिक्स नेत्रालय' उभारण्याचे स्वप्न

नगर – एका छोट्याशा गावातून सुरू झालेली चळवळ आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात प्रकाश पेरत आहे. नगर तालुक्यातील नागरदेवळे येथील जालिंदर बोरुडे यांनी सामाजिक बांधिलकीतून सुरू केलेली नेत्रदान चळवळ आज अनेकांसाठी आशेचा किरण ठरली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या फिनिक्स सोशल फाउंडेशनने मरणोत्तर नेत्रदानाच्या माध्यमातून तब्बल ११६० दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळवून दिली आहे.


फिनिक्स सोशल फाऊंडेशनने मरणोत्तर नेत्रदानाच्या माध्यमातून ११६० दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळवून दिली.

'नेत्रदान हेच सर्वश्रेष्ठ दान' या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन गेली तीन दशके सुरू असलेले हे कार्य आज राज्यभरात आदराने पाहिले जाते. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून केवळ नेत्रदान जागृतीच नव्हे, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे मोठे जाळे उभे करण्यात आले आहे.

जलसंपदा विभागात टेलिफोन ऑपरेटर म्हणून कार्यरत असताना जालिंदर बोरुडे यांच्या मनात समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा निर्माण झाली. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या कार्यातून प्रेरणा घेत त्यांनी १९९१ मध्ये फिनिक्स फाऊंडेशनची स्थापना केली. सुरुवातीला नेत्रदान क्षेत्रात काम करण्याचा कोणताही ठराविक विचार नव्हता. मात्र विडी कामगार, हमाल, बांधकाम मजूर, शेतकरी, कष्टकरी, महिला आणि गरीब घटकांमधील दृष्टीदोषाच्या समस्या पाहून त्यांनी या क्षेत्रात काम करण्याचा निर्धार केला. त्यानंतर सुरू झालेला प्रवास आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात प्रकाश आणणारा ठरला आहे.

फिनिक्स फाऊंडेशनच्या माध्यमातून दरमहा जिल्ह्यातील विविध भागांत मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित केली जातात. नागरदेवळे, पारनेर, शेवगाव, नेवासा, पाथर्डी तसेच नगर शहरात नियमितपणे ही शिबिरे भरविली जातात. विशेष म्हणजे, प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला नागरदेवळे येथे आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिराचा लाभ राज्यातील विविध जिल्ह्यातून येणारे अनेक गरजू रुग्ण घेत आहेत. आतापर्यंत सुमारे ३ लाख ९७ हजार ४४७ रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली असून हजारो नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे.

समाजकार्यात अनेकदा अडथळे येतात. घरचं खाऊन कशाला लष्कराच्या भाकऱ्या भाजता? अशा स्वरूपाचे टोमणेही जालिंदर बोरुडे यांना अनेकदा ऐकावे लागले. मात्र त्यांचे उत्तर कायम एकच असते समाधान मिळतं ना, मग बस! हेच समाधान त्यांना गेली ३५ वर्षे या चळवळीत कार्यरत ठेवत आहे. आज त्यांच्या कार्यामुळे हजारो रुग्ण त्यांना आपल्या कुटुंबातील व्यक्तीप्रमाणे मानतात.

नेत्रदान चळवळीचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी जालिंदर बोरुडे यांनी 'दृष्टीमित्र' आणि 'नेत्रज्योत' ही दोन प्रेरणादायी पुस्तके लिहिली आहेत. आजही फिनिक्स फाऊंडेशनच्या शिबिरांमध्ये राज्यभरातून नागरिक सहभागी होत असून नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

### फिनिक्स नेत्रालयाचे स्वप्न लवकरच साकार

गरजू, गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना अत्याधुनिक व मोफत नेत्रोपचार उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून 'फिनिक्स नेत्रालय' उभारण्याची तयारी सुरू आहे. तपोवन रोड परिसरात प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाचे आराखडे आणि डिझाइन तयार झाले असून आवश्यक मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. लोकवर्गणी, समाजातील दानशूर व्यक्तींचे सहकार्य आणि सामाजिक सहभागाच्या बळावर हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होणार आहे. फिनिक्स नेत्रालयाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना दर्जेदार आणि मोफत नेत्रोपचार उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने हा प्रकल्प निश्चितच पूर्णत्वास जाईल, असे फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे म्हणाले.

# कर्नाटकच्या धर्तीवर महाराष्ट्रातही एससी उपवर्गीकरणाची गरज

### आरक्षणाचा लाभ खऱ्या अर्थाने सर्व वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार : ॲड. अमित थोरात



नगर – कर्नाटक सरकारने अनुसूचित जाती (एससी) आरक्षणामध्ये उपवर्गीकरण लागू करून सामाजिक न्यायाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मान्यतेनंतर कर्नाटकमध्ये एससी आरक्षणाचे अंतर्गत विभाजन करण्यात आले असून, विविध उपजातींना त्यांच्या लोकसंख्या व मागासलेपणाच्या आधारे स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हे उपवर्गीकरण काळाची गरज असल्याची भावना सामाजिक न्याय अभ्यासक ॲड. अमित थोरात यांनी व्यक्त केली.

ॲड. अमित थोरात यांनी सांगितले की, आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातींतील सर्व घटकांपर्यंत समानपणे पोहोचणे आवश्यक आहे. काही जातींनाच सातत्याने लाभ मिळत असेल आणि इतर समाज घटक मागे राहत असतील तर सामाजिक न्यायाचा मूळ हेतू साध्य होत नाही. कर्नाटक सरकारने अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये अंतर्गत वर्गीकरण करून विविध गटांना स्वतंत्र वाटा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या निर्णयासाठी कायदेशीर आणि घटनात्मक आधार तयार करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ॲड. थोरात पुढे म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये मातंग, चर्मकार, ढोर, खाटीक, मेहतर तसेच इतर अनेक अनुसूचित जातींच्या समाजांकडून दीर्घकाळापासून उपवर्गीकरणाची मागणी होत आहे. राज्य शासनाने जातीवार शैक्षणिक, सामाजिक व नोकरीतील प्रतिनिधित्वाचा अभ्यास करून वास्तव परिस्थिती समोर आणावी. त्यानंतर सर्व घटकांना न्याय देणारे धोरण आखण्याची मागणी त्यांनी केली आहे.

आरक्षणावरील हक्क कमी करणे हा उपवर्गीकरणाचा उद्देश नसून आरक्षणाचा लाभ सर्वात वंचित घटकांपर्यंत पोहोचविणे हा त्यामागील मूलभूत हेतू आहे. सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कर्नाटकच्या मॉडेलचा अभ्यास करून आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी देखील त्यांनी केली.

सामाजिक न्याय म्हणजे केवळ आरक्षण देणे नव्हे, तर आरक्षणाचा लाभ खऱ्या अर्थाने सर्व वंचित घटकांपर्यंत पोहोचविणे होय. त्यामुळे महाराष्ट्रातही अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत गांभीर्याने विचार होणे काळाची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.


राज्यभर मातंग समाजाचे अ, ब, क, ड उपवर्गीकरण व्हावे यासाठी अहिल्यानगर मातंग समाजाच्या वतीने आमदार अमित गोरखे यांची मंत्रालय मुंबई येथे जाऊन मातंग समाजाचे ज्येष्ठ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वात व महालक्ष्मी देवस्थानचे अध्यक्ष उमेश साठे यांनी अ, ब, क, ड उपवर्गीकरण संदर्भात निवेदन देण्यात आले.

# राज्यातील पुरस्कार प्राप्त व्यक्तींना शासनाने 'मानधन' सुरू करावे

### मातंग समाजाचे अ, ब, क, ड उपवर्गीकरण संदर्भात आ. अमित गोरखे यांना निवेदन

मुंबई – राज्यभर मातंग समाजाचे अ, ब, क, ड उपवर्गीकरण व्हावे. यासाठी अहिल्यानगर मातंग समाजाच्या वतीने आमदार अमित गोरखे यांची मंत्रालय मुंबई येथे जाऊन मातंग समाजाचे ज्येष्ठ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वात व महालक्ष्मी देवस्थानचे अध्यक्ष उमेश साठे यांनी अ, ब, क, ड उपवर्गीकरण संदर्भात निवेदन देण्यात आले. यावेळी संतोष शेलार, सतीश खळवे, राजेंद्र आल्हाट, संजय शेलार, प्रमोद आरणे, शेषराव कारखेलेकर, संजय विरुळे, गोविंद सूर्यवंशी, अविनाश साठे, लक्ष्मण तिकटे, सुदामराव आवाडे आदी उपस्थित होते.

या निवेदनात सांगितल्याप्रमाणे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त व्यक्तींना प्रति महिना १५ हजार रुपये प्रमाणे मानधन देण्यात यावे. तसेच एसटी महामंडळाच्या सर्व बसेस मध्ये विना मूल्य प्रवास सुविधा मिळावी. या मागणी चे निवेदन मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी आमदार अमित गोरखे यांनी असे आश्वासन सकल मातंग समाज बांधवांना दिले की लवकरच अहिल्यानगर शहरात सकल मातंग समाज मेळावा घेण्यासाठी तारीख जाहीर करणार आहेत. व अ, ब, क, ड.उपवर्गीकरणसंदर्भात आपण दिलेले निवेदन शासनाकडे अंमलबजावणी साठी प्रयत्न करण्यात येईल.असे त्यांनी सांगितले.

परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांची मुंबई मंत्रालय येथे समक्ष भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी मंत्री महोदय यांनी असे आश्वासन दिले की, मंत्रिमंडळात सदरील मागणी मंजूर करण्यासाठी पाठपुरावा करू असे आश्वासन दिले.

# आभाळात विमान, मनात 'नगरी' लहेजा अन् घरात २ वर्षांचा सत्याग्रह

### कॅप्टन नीलम इंगळे-लोबो यांची प्रेरणादायी यशोगाथा



नगर – विमान चालवणं हे फक्त तंत्रज्ञान नसून ती एक कला आहे. हवेत हजारो फूट उंचावर असताना तुमची प्रसंगावधानता आणि टीमवर्कच तुम्हाला सुरक्षित जमिनीवर आणू शकतं, असे प्रतिपादन एअरबस ए-३५० च्या लाईन ट्रेनिंग कॅप्टन नीलम इंगळे-लोबो यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील मांडवे (सदुरवाडी) येथील जगदंबा देवी मंदिर परिसरात आयोजित 'आनंदवन निसर्ग श्रमसाधना शिबीर-२०२६' च्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या. या शिबिराचे आयोजन संदीप राठोड यांच्या कल्पनेतून करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी उपवनसंरक्षक धर्मराज सालविठ्ठल होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कॅप्टन रॉबिन लोबो (बोईंग-७७७ कमांडर), सहाय्यक उपवनसंरक्षक गणेश मिसाळ, संतोष महाराज शास्त्री, आयएफएस अक्षय पवार, सरपंच राजेंद्र लवांडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

### 'चूल आणि मूल' ते 'कॉकपिट'पर्यंतचा प्रवास

आपल्या कौटुंबिक प्रवासाविषयी बोलताना कॅप्टन नीलम म्हणाल्या, माझा जन्म 'चूल आणि मूल' हीच महिलांची ओळख असणाऱ्या कुटुंबात झाला. पण माझी आई शिकली, प्राध्यापिका झाली आणि तिथून आमची पिढी बदलली. निसर्गाची तुलना मुलींशी करताना त्या भावूक होऊन म्हणाल्या, निसर्गातील झाडे स्वतः उन्हात जळतात, पण इतरांना सावली देतात. मुलगीही तशीच असते, जी स्वतः सोसून दोन्ही घरांना सावरून धरते. म्हणूनच, मुलींना आणि झाडांना जगवणे ही आपली संस्कृती आहे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी महिलांचे प्रमाण आज केवळ १२ ते १३ टक्के असून ते जेव्हा ४५ ते ५० टक्के होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाज सुधारेल, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. आपल्या प्रवासातील पडद्यामागचा संघर्ष सांगताना त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. जेव्हा मी पायलट बनण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा घरातून प्रचंड विरोध झाला. मुलगी असल्याने इंजिनिअरिंग किंवा आयटी करण्याचा सल्ला मिळाला, कारण पायलट ट्रेनिंगचा खर्च सामान्य कुटुंबाला परवडणारा नव्हता. पण मी जिद्दीवर ठाम राहिले. घरात अडीच वर्षे कोणाशीही न बोलता मी 'सत्याग्रह' केला. अखेर माझ्या या जिद्दीपुढे कुटुंबियांना नमावे लागले आणि पुढे टाटा स्कॉलरशिप व मुख्यमंत्री निधीतून माझे हे स्वप्न पूर्ण झाले, असे त्यांनी सांगितले.

हवेत दोन विमाने समोरासमोर आल्यास काय होते, याबद्दल त्यांनी उपस्थितांना सोप्या भाषेत तांत्रिक माहिती दिली. विमानातील अत्याधुनिक यंत्रणा अवघ्या काही सेकंदांत आपापसात संवाद साधतात. यंत्रणेच्या सूचनेनुसार एक विमान वर जाते तर दुसरे खाली, ज्यामुळे हवेतील मोठे अपघात टळतात. तसेच त्यांनी कॅबिन प्रेशर आणि सुरक्षेविषयी असणारे गैरसमज दूर केले.

प्रास्ताविक सुनील मरकड यांनी केले. सूत्रसंचालन अशोक व्यवहारे यांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सूर्यकांत काळोखे, सुनील मरकड, गणेश कांबळे, सुधाकर ढाकणे, युवराज जगताप आदींसह ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

### अस्सल 'नगरी' लहेजाने जिंकली मने!

कॅप्टन नीलम यांनी यावेळी आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली. त्यांच्या कुटुंबातील एका लग्नाचा किस्सा सांगताना, मुंबईच्या धारावीतील बहीण आणि गावाकडची आजी-काकू समोरासमोर आल्यावर झालेला संवाद त्यांनी अस्सल 'नगरी' बोलीभाषेत सादर केला. अगं धारावदी, चावलं म्हणजे गिळलं अन् परता पाडल्यावर कळल... आताच काय कळतंय तुला माती! हे त्यांनी अस्सल नगरी भाषेत सादर करताच संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट आणि हास्याचे कारंजे उडाले.

# 'मृत्यूनंतरही दृष्टीदानाचा वारसा जपूया; प्रत्येक नागरिकाने नेत्रदानाचा संकल्प करावा'

### स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे नेत्रदान जनजागृती पोस्टरचे अनावरण

नगर – नेत्रदान हे मानवतेच्या सेवेसाठी केले जाणारे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. आपल्या मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची ताकद नेत्रदानामध्ये आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने नेत्रदानाचा संकल्प करून आपल्या कुटुंबीयांशी त्याबाबत जागरूक करावे, असे आवाहन स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.



नेत्रदान जनजागृती पोस्टरचे अनावरण करताना जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, 'स्नेहबंध'चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे.

स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने १० जून जागतिक नेत्रदान दिनानिमित्त जनजागृती पोस्टरचे अनावरण जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी आणि पोलीस निरीक्षक (गृह) रवींद्र देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फौंडेशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. शिंदे म्हणाले की, नेत्रदानामुळे अंधत्वाने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना नवजीवन मिळू शकते. आपल्या मृत्यूनंतरही दोन व्यक्तींना दृष्टी देण्याचे भाग्य नेत्रदानातून मिळते. समाजात नेत्रदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी या चळवळीत सहभागी व्हावे. नेत्रदानाचा संकल्प हा केवळ एक फॉर्म भरण्यापुरता मर्यादित न ठेवता त्याबाबत आपल्या कुटुंबियांना माहिती देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने नेत्रदानाचा विचार करून समाजात जनजागृती निर्माण करावी, असेही त्यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिरिष्ट वर्णन केलेल्या **प्लॉटस् मिळकती** या विद्यमान मालक **करण किशोर गांधी** रा. शांतीनिकेतन स्टेशन रोड, अहिल्यानगर, **प्रमोद अमृतलाल गांधी** रा.बुरुडगांव रोड, अहिल्यानगर, **संदेश विजय मुनोत** रा. मुनोत इस्टेट, स्टेशन रोड, अहिल्यानगर यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर प्लॉटस् मिळकती त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर प्लॉट मिळकती आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. विद्यमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम स्विकारली आहे. सदर प्लॉट मिळकती. लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही सदर मिळकतीबाबत कोणतेही **साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हकक हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.
**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी** येथील **सर्व्हे नं. ३०४/४ मधील प्लॉटस् मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

| | | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ४/१० | १२०.०० | प्लॉट नंबर ४/९ | प्लॉट नंबर ४/७ | प्लॉट नंबर ४/११ | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ४/११ | १२०.०० | प्लॉट नंबर ४/१० | प्लॉट नंबर ४/६ | प्लॉट नंबर ४/१२ | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ४/१२ | १४५.०१ | प्लॉट नंबर ४/११ | प्लॉट नंबर ४/५ | लागू सर्व्हे नं ३०४/३ पैकी | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| एकूण | ३८५.०१ चौ.मी. | | | | |

येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक मिळकती दरोबस्त तदंगभूत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणूक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकती.

ता. ११/०६/२०२६, अहिल्यानगर

**ॲड.सुनिल गोरक्षनाथ हरिश्चंद्रे,**
**ॲड.ओंकार पंडित मोरे**
मो : ९८६०६४६४६३, ऑफिस : गाळा नं.४, महालक्ष्मी चेंबर्स,पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

## : सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग :

मे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या.अ.नगर
महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर यांचे कार्यालय.

### जाहीर समन्स

**डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संत आण्णा चर्च, कलेक्टर कचेरीजवळ, अहिल्यानगर, ता/जि. अहिल्यानगर.** या संस्थेने त्यांचे कर्जदार/जामिनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणे बाबत प्रस्ताव दिनांक. १५/०७/२०२५ रोजी या कार्यालयास दाखल केला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक १८/११/२०२५ व दिनांक १०/१२/२०२५ रोजी सुनावणीची नोटीस देऊन त्यांची सुनावणी दिनांक १०/१२/२०२५ व दिनांक २३/१२/२०२५ व दिनांक ०७/०१/२०२६ व दिनांक १०/०२/२०२६ व दिनांक २५/०२/२०२६ व दिनांक ११/०३/२०२६ व दिनांक ०८/०४/२०२६ व दिनांक १५/०४/२०२६ व दिनांक २९/०४/२०२६, २०/०५/२०२६ व दिनांक ८/०४/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाबदेणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनावणी दिनांक - १७/०६/२०२६ रोजी सकाळी १२:०० वाजता मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर महात्मा फुले चौक, गाळा नं.४. पहिला मजला,जी.एस. महानगर बँकेशेजारी अहिल्यानगर यांचे कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केले प्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.नं. | दावा क्रमांक | कर्जदार/जामिनदाराचे नांव | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १८२ २०२५ | जाबदेणार १) श्री.बारस्कर संभाजी पोपटराव<br>राहणार - गुलमोहर हौ. कॉलनी, तांबटकरमळा, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री.गवळी श्रीनाथ माणिक.<br>रा.प्लॉट नं. २५, स.न.८१, विशालनगर, गांधीनगर, बोल्हेगाव,अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री.गडदे सुनिल सुदाम<br>रा.:- प्लॉट नं.८, दळवी मळा, गुलमोहर रोड,वसंत टेकडी,सावेडी,अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ-बारस्कर सिमा संभाजी.<br>राहणार:- गुलमोहर हौ. कॉलनी, तांबटकरमळा, अहिल्यानगर | ९३,८९,५९०/- |
| २ | १८५ २०२५ | जाबदेणार १) श्री.गडदे सुनिल सुदाम.<br>रा :- प्लॉट नं.८, दळवी मळा, गुलमोहर रोड, वसंत टेकडी, सावेडी,अ.नगर.<br>जाबदेणार २) श्री.धोत्रे संजय बाबुराव.<br>राहणार :-द्वारा-जगदाळे सुनिल अमृत. कलश अपार्ट.<br>चिंतामणी हॉस्पि. समोर,बोरुडे मळा,बालिकाश्रम रोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री.जाधव विलास विठ्ठल.<br>राहणार :- प्लॉट नं. २४, सन.१९/१ए, गावडे मळा, पा. लाईन रोड, सावेडी, अ.नगर.<br>जाबदेणार ४) सौ-गडदे संजीवनी सुनिल.<br>रा :- प्लॉट नं.८,दळवी मळा,गुलमोहर रोड,वसंत टेकडी,सावेडी,अ.नगर. | ९४,१७,०३१/- |

ठिकाण : अहिल्यानगर
दि.१०/०६/२०२६

शिक्का

**(बाळकृष्ण शिंदे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा), अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन,अ.नगर

## भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांचे कार्यालय, शिर्डी

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,
२०१३ चे कलम १९ (१) नुसार अधिसुचना

जिल्हा :- अहिल्यानगर

### अधिसूचना

क्रमांक भुसं/कार्या/का.वि./६/६८०/२०२६/मौ. कोऱ्हाळे/ता. राहाता/२०२६/एलएक्यू/एसआर/०२/२०२५

ज्याअर्थी, अहिल्यानगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचेकडील आदेश क्र. क्र-भूसं/कार्या/१६-अ/ई-२६५८७२३/२०२५ दि.३१/१०/२०२५ नुसार उक्त अधिनियमाच्या कलम ३(जी) चे तरतुदीनुसार प्रस्तुत प्रकरणी भुसंपादन प्रक्रियेचे अधिकार उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांना प्रदान केले आहेत.

ज्याअर्थी, प्रदान केलेल्या प्राप्त अधिकारानुसार उपविभागीय अधिकारी शिर्डी यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे.) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारे असे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन,अधिसूचना क्र. भुसंपादन मौजे कोऱ्हाळे ता.राहाता एसआर-०२/२०२५/का.वि.-६/५९५/२०२६ दिनांक १० फेब्रुवारी २०२६ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढली आहे. सदर अधिसूचना विहीत पध्दतीने प्रसिध्द केलेली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूची ''एक'' मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची ''दोन'' मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, अहिल्यानगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल (कोणताही असल्यास), विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे. आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) तरतुदीअन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची ''तीन'' मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणून निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची ''चार'' मध्ये विनिर्दिष्ट केला आहे. आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शिर्डी तालुका राहाता जिल्हा अहिल्यानगर यांना पदनिर्देशित केले आहे.

**अनुसूची-एक**
**जमिनीचे वर्णन**

गाव-मौ.कोऱ्हाळे तालुका-राहाता जिल्हा अहिल्यानगर

| अ.क्र. | भूमापन किंवा गट नंबर | आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | गावठाण पैकी | ०.०२०० |
| २ | ३४६ पैकी | ०.१८०० |
| ३ | ३४७ पैकी | ०.०३०० |
| ४ | ३४७ पैकी | ०.०२०० |
| ५ | ३४७ पैकी | ०.११०० |
| ६ | ३४७ पैकी | ०.०३०० |
| ७ | ३४७ पैकी | ०.३२०० |
| ८ | ३४७ पैकी | ०.१२०० |
| ९ | ३४७ पैकी | ०.११०० |
| १० | ३४८ पैकी | ०.०५०० |
| ११ | ३४३ पैकी | ०.२७०० |
| १२ | ३४९ पैकी | ०.०४०० |
| १३ | ३५० पैकी | ०.०१०० |
| १४ | ३५० पैकी | ०.०२०० |
| १५ | ३५० पैकी | ०.०२०० |
| १६ | ३५१ पैकी | ०.०५०० |
| १७ | ३५४ पैकी | ०.०४०० |
| १८ | ३५६ पैकी | ०.०७०० |
| १९ | ३५७ पैकी | ०.०४०० |
| २० | ३५७ पैकी | ०.०३०० |
| २१ | ३५७ पैकी | ०.०२०० |
| २२ | ३५८ पैकी | ०.०५०० |
| २३ | ३५९ पैकी | ०.६००० |
| २४ | ३६६ पैकी | ०.३८०० |
| २५ | ३६६ पैकी | ०.४००० |
| २६ | ३६७ पैकी | ०.१५०० |
| २७ | ३८० पैकी | ०.१६०० |
| २८ | ३८० पैकी | ०.२६०० |
| २९ | ३७९/३ पैकी | ०.३९०० |
| ३० | ३७९/४ पैकी | ०.०१०० |
| ३१ | ३७९/५ पैकी | ०.०१०० |
| ३२ | ३७८ पैकी | ०.०८०० |
| ३३ | ३७८ पैकी | ०.०४०० |
| ३४ | ३७८ पैकी | ०.०३०० |
| ३५ | ३७७ पैकी | ०.१४०० |
| ३६ | ३७७ पैकी | ०.१००० |
| ३७ | ३७७ पैकी | ०.१४०० |
| ३८ | ३७७ पैकी | ०.१६०० |
| एकूण | | ४.७००० |

**अनुसूची-दोन**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- मौ. कोऱ्हाळे तालुका- राहाता जिल्हा अहिल्यानगर येथील जमिन निळवंडे-कोठे कमळेश्वर-काकडी-नांदुर्खी (प्रजिमा-१०) रस्त्याचे चौपदरीकरणासाठी भुसंपादन

प्रकल्प कार्याचे नाव :- मौ. कोऱ्हाळे तालुका- राहाता जिल्हा अहिल्यानगर येथील जमिन निळवंडे कोठे कमळेश्वर-काकडी-नांदुर्खी (प्रजिमा-१०) रस्त्याचे चौपदरीकरणासाठी भुसंपादन

समाजाला मिळणारे लाभ :- भुसंपादन करावयाचे जमिनीबाबत राज्य शासनाच्या असा उद्देश आहे की, जनतेच्या सार्वजनीक हितासाठी, सुरक्षित व सुरळीत वाहतुक होणेसाठी पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देणे असा सार्वजनिक हिताचा उद्देश आहे.

**अनुसुची - तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास :- लागु नाही.
भाग पाडणारी कारणे

**अनुसुची - चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :- प्रस्तुत प्रकरणी मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील अधिसुचना असाधारण क्र.१० दि. ३० जानेवारी २०२६ मधील क्र. एसआयए /सी.आर.-१७/२०२६ दि. २२ जानेवारी २०२६ नुसार भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ प्रकरण दोनच्या व प्रकरण तीनच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

**अनुसुची - पाच**

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल :- लागु नाही.

टिप :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.
दिनांक :- ०४ जून २०२६
ठिकाण :- शिर्डी

**(माणिक आहेर)**
भुसंपादन अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी
शिर्डी भाग शिर्डी

जिमाका/नगर/जाहि/३२/२०२६.

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : ५ ते ११ जून २०२६
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
SCREEN - 1
हे जवानी तो इश्क होना है
12.00 pm 150/-
3.00 pm 150/-
9.00 pm 150/-
पेड्डी 9.00 am 100/-
6.00 pm 150/-
SCREEN - 2
देऊळबंद २ मराठी
9.00 am 100/-
12.00 pm 150/-
3.15 pm 150/-
9.15 pm 150/-
तुंबाडची मंजुळा
6.30 pm 150/-
आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

ॲडव्हान्स बुकिंग सुरू
my cinema
AHILYANAGAR'S 1ST 5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow
- Show -
12/6/2026
to 14/6/2026
HAUNTED GHOSTS (3d)- 1:20, 10:45 pm, TUMBADCHI MANJULA (Marathi)- 2:15, 8:00, 10:35 pm, BHARAT BHAGYA VIDHATA- 8:45am, 4:30, 10:45pm, CHAND MERA DIL - 11:00 am, DEOOL BAND 2 (Marathi) - 11:05 am, 1:05, 4:15, 7:30, 9:45 pm, PEEDI (Hindi) - 4:50 pm, GOVERNER: THE SILENT.. - 9:10 am, 2:15, 8:30 pm, HAI JAWANI TOH ISHQ - 8:45 am, 3:45, 6:10 pm, MAIN VAAPAS AAUNGA - 11:20 am, 6:50 pm, THE MAHARASHTRA FILES (Marathi) - 11:00 am,
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : ४ ते ११ जून २०२६
तुंबाडची मंजूळा मराठी 10.15 AM, 4.25 PM
कृष्णाअवतारम हिंदी 1.05 PM
हिमॅन अँड द मास्टर्स ऑफ द युनिव्हर्स हिंदी 1.50 PM, 7.15 PM
राजे शिवाजी मराठी 3.50 PM
बंदर हिंदी 7.30 PM, 10.15 PM
देऊळबंद २ मराठी 8.00 AM, 10.30 AM, 2.55 PM
हे जवानी तो इश्क होना है हिंदी 8.00 AM, 11.35 AM, 2.10 PM, 4.45 PM, 7.20 PM, 10.00 PM
पती पत्नी और वो दो हिंदी 8.00 AM
पेड्डी हिंदी 8.10 AM, 11.30 AM, 9.40 PM
तेलगु 6.10 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

# हॉस्पिटलमधील मेडिकलमधूनच औषध खरेदीची सक्ती केल्यास कारवाई

### अन्न व औषध प्रशासनाचे आदेश

नगर - हॉस्पिटल्सशी संलग्न असलेल्या मेडिकल स्टोअर्समधूनच औषधे खरेदी करण्याची सक्ती आता बंद होणार आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना त्यांच्या सोयीनुसार बाहेरून औषधे घेण्याचा पूर्ण अधिकार असून, यापुढे प्रत्येक हॉस्पिटलला आपल्या मेडिकलच्या दर्शनी भागात औषध खरेदीची सक्ती नाही असा फलक लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर विभागाचे सहआयुक्त जा. ह. शेख यांनी यासंदर्भात आदेश बजावले आहेत.

नितीन भुतारे यांनी यासंदर्भात अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे तक्रार केली होती. हॉस्पिटलमधील मेडिकलमधून औषधे घेण्याची सक्ती केली जाते, कोणत्याही प्रकारची सवलत दिली जात नाही आणि औषधांच्या बिलांमध्ये लूट केली जाते, असा आरोप त्यांनी पत्राद्वारे केला होता. रुग्णांना कोणते औषध दिले जाते, हेही नातेवाईकांना स्पष्टपणे समजत नसल्याची व्यथा त्यांनी मांडली होती. या मागणीची दखल घेत प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त जा. ह. शेख यांनी जिल्ह्यातील सर्व हॉस्पिटलमधील मेडिकल धारक आणि मेडिकल असोसिएशनला नोटीस बजावली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

जर कोणत्याही हॉस्पिटलने औषध खरेदीसाठी सक्ती केली किंवा नातेवाईकांना बाहेरून औषधे घेऊ दिली नाहीत, तर तातडीने अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधून तक्रार करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या निर्णयामुळे रुग्णांची आर्थिक लूट थांबण्यास निश्चितच मदत होणार आहे.



'संकल्प प्रतिष्ठान' संचलित 'सावली' आश्रमातील बांधवांना व बालकांना भाजप अल्पसंख्याक शहराध्यक्ष मोसिन शेख यांच्या वतीने मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले.

# 'सावली' आश्रमात मिष्टान्न भोजन वाटप

### मोसिन शेख यांचा उपक्रम

नगर - 'संकल्प प्रतिष्ठान' संचलित 'सावली' आश्रमातील बांधवांना व बालकांना भाजप अल्पसंख्याक शहराध्यक्ष मोसिन शेख यांच्या वतीने मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. धनंजय जाधव यांना उदंड आयुष्यासाठी आणि सुदृढ आरोग्यासाठी यावेळी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी बोलताना मोहसीन शेख म्हणाले की, नेते किंवा पदाधिकारी हे केवळ पदापुरते मर्यादित नसून ते जनतेचे सेवक असतात. धनंजय जाधव यांनी नेहमीच सर्वसामान्य जनतेच्या सुखादुःखात धावून जाण्याची भूमिका घेतली आहे. अशा जनमानसातील नेत्याचा वाढदिवस साजरा करताना, समाजातील सर्वात उपेक्षित आणि 'सावली'च्या शोधात असलेल्या आपल्या हक्काच्या माणसांना आनंद देणे हे आमचे कर्तव्य होते. अन्नापेक्षा मोठे कोणतेही दान नाही, आणि या बालकांच्या चेहऱ्यावरील हसू हीच धनंजय भाऊंसाठी खरी आणि सर्वात मौल्यवान वाढदिवसाची भेट आहे. या उपक्रमातून आम्हाला आत्मिक समाधान लाभले असून, यापुढेही असे सामाजिक कार्य आम्ही सातत्याने करत राहू.

या सामाजिक उपक्रमाप्रसंगी भाजपा अल्पसंख्यांक उपाध्यक्ष अकबर अली शेख, मुजु शेख, भैय्या पठाण, राहुल मुथा, महेश महादर, विनोद त्यागा, राम खारगे व तसेच मित्र परिवार उपस्थित होते

An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Become a COMPUTER PROFESSIONAL
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
Enroll Now
www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा 9371051769
जुने बस स्टँड शाखा 9371151769
पाईपलाईन शाखा 7447761769

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **वसीम मोहम्मद हनीफ शेख,** रा. सर्जेपुरा रोड, गॅरेज लाईन, अल्फा गॅरेज मागे, झोपडपट्टी, कोठला, अहमदनगर. यांच्या मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असून लवकरच खरेदीखत होणार आहे व विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारादाखल रक्कम देखील स्वीकारलेली आहे व दरम्यानच्या काळात विद्यमान मालक हे इतर त्रयस्त व्यक्तीसोबत व्यवहार करणार नाही अशी खात्री व हमी दिलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **(सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट : मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २७८/३ | १९ | २४५.०० चौ.मीटर |

**यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचा दक्षिणेकडील बाजूचा १०४.०८ चौ.मीटर प्लॉट मिळकत. यांसी चतुःसिमा-**
पुर्वेस - ६ मीटर रस्ता, दक्षिणेस - सर्व्हे नंबर पैकी प्लॉट
पश्चिमेस - सर्व्हे नंबर पैकी प्लॉट, उत्तरेस - प्लॉट नंबर ११ पैकी उर्वरीत क्षेत्र
दि.११/०६/२०२६. अ.नगर

**ॲड.तनवीर एम.शेख** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**ॲड.मोहसीन आय.शेख । ॲड.गुफरान एफ.मोमीन**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर, मो.नं.९२७०४६४६००,८०८७७४२४२८

# नगरमध्ये १३ जूनला करिअर मार्गदर्शन मेळावा व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

नगर - मराठा समाजातील विद्यार्थी, पालक आणि तरुणांना करिअरच्या विविध संधींची माहिती मिळावी, तसेच शैक्षणिक क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव व्हावा, या उद्देशाने अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन यांच्या वतीने १३ जून रोजी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व भव्य करिअर मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

शहरातील सक्कर चौक येथील हॉटेल यश पॅलेस येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. हा उपक्रम विद्यार्थी आणि पालकांसाठी पूर्णपणे मोफत असून, नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात करिअरचे योग्य मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे, यासाठी फाउंडेशनने विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना आमंत्रित केले आहे. यामध्ये डॉ. धनंजय वारे हे वैद्यकीय व फार्मसी क्षेत्रातील संधी आणि नीट परीक्षेचे महत्त्व, डॉ. दादासाहेब करंजुले हे उच्च शिक्षण, करिअर नियोजन आणि स्पर्धा परीक्षांची तयारी, इंजी. डॉ. विजयकुमार ठुबे हे रोजगाराच्या नव्या संधी व व्यक्तिमत्त्व विकास, प्रा. अमोल सायंबर हे शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह आणि करिअर निवडीचे निकष, प्रा. अतुल सोनवणे हे युपीएससी आणि एमपीएससी स्पर्धा परीक्षांमधील संधी व अभ्यासाचे नियोजन या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमात दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या सत्काराद्वारे विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करून इतरांना प्रेरणा देण्याचा फाउंडेशनचा मानस आहे. तसेच, विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी विशेष प्रश्नोत्तर सत्र देखील आयोजित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी आयोजित या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## : सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग :

मे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या.अ.नगर
महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर यांचे कार्यालय.

### जाहीर समन्स

**श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्था मर्या, दाळमंडई, अहिल्यानगर ता. जि. अहिल्यानगर** या संस्थेने त्यांचे कर्जदार/जामिनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणे बाबत प्रस्ताव दिनांक २७/०६/२०१७ रोजी या कार्यालयास दाखल केला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक २७/०५/२०२५ व दिनांक १८/११/२०१९ व दिनांक ११/११/२०२० व दिनांक २९/०३/२०२२ व दिनांक ०७/१२/२०२३ व दिनांक २५/०२/२०२६ रोजी सुनावणीची नोटीस देऊन त्यांची सुनावणी दिनांक १३/०४/२०२२ व दिनांक २०/०५/२०२२ व दिनांक ०६/०६/२०२२ व दिनांक १९/१२/२०२३ व दिनांक २३/०१/२०२४ व दिनांक ०६/०२/२०२४ व दिनांक २१/०२/२०२४ व दिनांक ०५/०३/२०२४ व दिनांक ११/०३/२०२६ व दिनांक ०८/०४/२०२६ व दिनांक १५/०४/२०२६ व दिनांक २९/०४/२०२६ व दिनांक १०/०६/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाबदेणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनावणी दिनांक २४/०६/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर महात्मा फुले चौक, गाळा नं.४. पहिला मजला जी.एस. महानगर बँकेशेजारी, अहिल्यानगर यांचे कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केले प्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.नं. | दावा क्रमांक | कर्जदार/जामिनदाराचे नांव | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २७१ २०२३ | जाबदेणार १) श्री. शंकर रामचंद्र शेलार<br>राहणार:- अ, २७, प्रेमदान हडको सावेडी, अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री-हेमराज सरदारमल गांधी.<br>राहणार :- २७५०, गंजबाजार, अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री नंदकिशोर बबनराव चोथे.<br>राहणार :- कलेक्टर कचेरीजवळ, अहिल्यानगर. | १,९६,०४०/- |

ठिकाण : अहिल्यानगर
दि.१०/०६/२०२६

शिक्का

**(बाळकृष्ण शिंदे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा),
अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन,अ.नगर

## जाहीर नोटीस


तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. सतिश माणकचंद बोथरा रा.मनिषा बंगला, पुनम मौती नगर, कोठी रोड, अहिल्यानगर** हे असून सदर मिळकत त्यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचेबरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून, सदर मिळकतीच्या खरेदीपोटी आमच्या अशिलाने विद्यमान मालक यांना विसारापोटी रक्कम दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम व बोजाविरहीत असून तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी अथवा लेखीकरार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारसहक्क, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच (सात) दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम आहे, असे ग्राह्य धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** - डि. अहिल्यानगर सब डिव्हीजन व तालुके अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगांव येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४३६/३/१ | ०.४३ | ०.०० |
| | पोट खराबा ०.०५ | |
| | एकूण ०.४८ | |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे संपूर्ण क्षेत्र ० हे ४२ आर ही संपूर्ण शेतजमीन मिळकत याबाबत. यांसी चतुः सिमा खालीलप्रमाणे-
पुर्वेस - सर्व्हे नंबर ४३६/३/२, पश्चिमेस - सर्व्हे नंबर ४३६/२
दक्षिणेस - जुना नगर-पुणे रस्ता, उत्तरेस - सर्व्हे नंबर ४३७
येणेप्रमाणे चतुर्सिमापूर्वक शेतजमीन मिळकत यामधील वागणुकीच्या, वहिवाटीच्या येणे-जाणे हक्कासह काही एक राखून न ठेविता असे.
दि.११/०६/२०२६,अहिल्यानगर.

**ॲड.सचिन चंद्रकांत फुलसौंदर**
ऑफिस-तळमजला, आनंदहाईस
जुने जिल्हा न्यायालयासमोर,
अहिल्यानगर, मो. नं. ९९२२२२७१७८


वाढदिवस शुभेच्छा
आशिर्वाद
आपल्या सक्षम
नेतृत्वामुळे,
अथांग जनसेवेमुळे
विकासाची गती,
समाजाला नवी दिशा
मिळाली आहे.
मा. श्री. आमदार
संग्रामभैय्या
जगताप
आपणांस जन्मदिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
* शुभेच्छुक *
बाबासाहेब (आप्पा) नागरगोजे । गहिणीनाथशेठ नागरगोजे । अंबादास (लिंबाशेठ) नागरगोजे
नगरसेवक, म.न.पा. अहिल्यानगर
उद्योजक
उद्योजक
अंबिका उद्योग समुह । शिव गौरांश पेट्रोलियम MIDC, अहिल्यानगर

**गोडाऊन व कापड दुकानात**

## कामगार पाहिजेत

सेल्समन : ३ जागा
हेल्पर : ३ जागा

पाईपलाईन रोड सावेडी, अहिल्यानगर

**9075500840**

---

**PEST CONTROL च्या कामासाठी त्वरित**

## मुलगा पाहिजे

१०वी/१२वी/पदवीधर
गाडी पाहिजे
(अहिल्यानगर परिसर)

- संपर्क -
**9404236274**
**8329447598**

---

## पाहिजेत

**फार्मासीस्ट**
१ जागा

होडशीळ हॉस्पिटल व प्रसुतिगृह
विराज इस्टेट, तारकपूर बसस्टॅण्ड समोर, अहिल्यानगर

**7769959721**

---

## पाहिजेत

कुक कारागीर – २
वेटर – ५

**भाऊचा ढाबा**
पत्ता : नवनागापूर गजानन कॉलनी, वडगाव गुप्ता रोड, एमआयडीसी, अहिल्यानगर

प्रभाकर भोर
**9890999737**

---

## कुक पाहिजे

नगर–पुणे रोडवर चासजवळ नव्याने सुरु झालेल्या हॉटेलसाठी नाश्ता बनवण्यासाठी कुक पाहिजे.
(राहण्याची सोय)

**9322995610**

---

## चतुर्थ पुण्यस्मरण



साथ सुटली
लाख मोलाची
छाया विरली,
आपल्या मायेची...
ज्योत विझली आशेची
वाट पाहतो आपल्या
पुनर्जन्माची..

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली...

**स्व.राजेंद्र नारायण गायकवाड**
स्व.दि.१२ जून २०२२

❋ दुःखांकित ❋

श्रीमती सुनिता राजेंद्र गायकवाड (पत्नी)
चि.सुरज राजेंद्र गायकवाड (मुलगा)
चि.सुजल राजेंद्र गायकवाड (मुलगा)

**वैष्णवी बुक स्टॉल** | **वैष्णवी फोटोग्राफी**

गायकवाड परिवार, दिल्लीगेट, अहिल्यानगर

---

## ॥ १० वे पुण्यस्मरण ॥



**स्व. श्री. दिगंबर (नाना) सदाशिवराव देवळालीकर**
(स्व. दि. ११/६/२०१६)

मावळला स्नेहदिप जरी, प्रकाश अजुन पुरणार आहे...
पाऊले निघुनी दुर गेली तरी, पाऊलखुणा उरणार आहेत...
आपल्या पावन स्मृतिस भावपुर्ण श्रद्धांजली

जयेश दिगंबर देवळालीकर, मुकेश दिगंबर देवळालीकर,
यश मुकेश देवळालीकर, संगीता संजय कपोते, सुरेखा संदेश शहाणे,
सुवर्णा उन्मेश शहाणे व समस्त देवळालीकर परिवार

---

## १५ वे पुण्यस्मरण

सुर्य जरी डोंगराआड गेला
तरी संधिप्रकाश रेंगाळतो
सहवास जरी संपला
तरी आठवणींचा सुगंध दरवळतो

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली..

❋ शोकाकुल ❋

श्रीमती. मंगल बाळासाहेब आरडे (आई)
राम रघुनाथ कोतकर (दाजी)
सौ. स्मिता राम कोतकर (बहीण)
मयुर बाळासाहेब आरडे (भाऊ)
सौ. पुजा मयुर आरडे (भावजई)



**स्व. प्रविण बाळासाहेब आरडे**
स्व. दि. १२/०६/२०११

**समस्त आरडे परिवार**

---

## ऑफिस भाड्याने देणे आहे

मार्केटयार्ड, अहिल्यानगर येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, पोलिस चौकी शेजारील ऑफिस भाड्याने देणे आहे

**Mo. 9422220438 / 9762803005**

---

## सिक्युरिटी गार्ड पाहिजेत 8788365654

---



आशीर्वाद

मा.आमदार

## संग्राम भैय्या जगताप

आपणास वाढदिवसाच्या आरोग्यमय शुभेच्छा!

**कैलास उडपी**

शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

Asha

---



आमचे स्नेही
आमदार

## श्री.संग्रामभैय्या जगताप

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..!

❋शुभेच्छुक❋


Om CONSTRUCTION ENG & GOVT CONTRACTOR | VENKATESH Infra Readymix Concrete

**इंजि.ओम शशिकांत आठरे पा.** B.E.Civil
**इंजि.व्यंकटेश शशिकांत आठरे पा.** B.E.Civil

व्यंकटेश उद्योग समुह
ऑफिस:-हॉटेल संदिप समोर,नगर-पुणे रोड,केडगाव,अहिल्यानगर

---

**शहर प्रगतीच्या साकार व्हाव्यात सदिच्छा**
**आपल्या वाढदिवसाच्या शुभदिनी आमच्याही शुभेच्छा !**




## अभिष्टचिंतन

## मा. आमदार श्री. संग्रामभैय्या जगताप

आपल्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली अहिल्या नगरीचा सर्वांगिण विकास होत आहे
**बुरुडगाव रोड चे अद्ययावत हॉस्पिटल..** चितळे रोडवरील **भव्य नियोजित भाजी मार्केट,**
रंगभवन येथील भव्य पार्किंगची **बहुमजली इमारत..** केडगाव येथील **ई-बस स्थानक..**
**माळीवाडा व सावेडी बस स्थानक...** या विविध प्रकल्पांतून शहर आकार घेत आहे.

या निर्मितीत आम्हालाही नवनिर्मिती
आणि खारीचा वाटा उचलण्याचा आनंद होत आहे...

चंपालाल, पंडीतलाल, विजयकुमार, दिलीपकुमार, सुभाषलाल,
वैभव, पवन, परेश, शुभम, अक्षय, सौरभ
एवम् गांधी परिवार – शिरुर (घोडनदी)

Dishan

**SS Gandhi** Construction Pvt. Ltd. | GC | **Gandhi** Construction

शिरुर – अहिल्यानगर – पुणे

---

## धर्मो रक्षति रक्षित:

जो धर्माचे रक्षण करतो, त्याचे रक्षण धर्म करतो..



## भैय्या

अहिल्यानगर जिल्ह्याची **आन बाण शान**
हिंदुत्ववाचा बुलंद आवाज
अहिल्यानगर शहराच्या मनावर
राज्य करणारं अद्भुत व्यक्तिमत्व
हिंदूधर्म रक्षक

मा.श्री. आमदार

## संग्रामभैय्या जगताप

आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

❋ शुभेच्छुक ❋



**ओंकार बाळासाहेब देशमुख**
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर